# चैतन्य लहरी

अंक क्र. ९, १०  सप्टेंबर-ऑक्टोबर २०००



सहजयोग अजून खूप मोठ्या प्रमाणावर पसरला पाहिजे; अजून खूप लोकांपर्यंत तो पोहोचला पाहिजे; म्हणून तुम्ही पूर्ण ताकद लावून त्या कार्याला लागले पाहिजे.

- प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवी
गुरू-पूजा, कबेला
२२ जुलै २०००







# • अनुक्रमणिका •


| अनु. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| (१) | संपादकीय : ईश्वरनिष्ठांची मांदियाळी | ३ |
| (२) | गुरु-पूजा<br>कबेला २३ जुलै २००० | ४ |
| (३) | ईस्टर पूजा<br>इस्तम्बूल २३ मार्च २००० | ८ |
| (४) | अमृतवाणी | ११ |
| (५) | नववर्ष-पूजा १९९५ | १२ |
| (६) | सहजयोग सेमिनार २००० पुणे | १४ |
| (७) | भक्ति आणि कर्म<br>दिल्ली २१-२-८६ | १८ |
| (८) | सहज-समाचार | २१ |
| (९) | नामदेवांचा अभंग | २२ |
| (१०) | सरस्वती-पूजा<br>धुळे १३-१-८३ | २३ |

**ईश्वरनिष्ठांची मांदियाळी** येत्या एकविसाव्या शतकामध्ये जगामध्ये विज्ञान फार मोठी झेप घेणार आहे. अलिकडच्या एक-दोन दशकांमध्ये संगणक आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात दररोज अत्याधुनिक यंत्रसामुग्री व साधने निर्माण होत आहेत. या गतिमान प्रणालीमध्ये आपल्याला मागे पडून चालणार नाही याची सर्वांना खात्री पटली आहे. त्याचबरोबर मानव-धर्म-शांति या त्रयीसूत्रींवर समस्त मानव जातीचा विचार करण्याच्या आवश्यकतेबद्दलच्या घटना मधून-मधून का होईना कानावर येत आहेत. धार्मिक प्रवचने, परिषदा, सभा, उत्सव इ. मधून माणूस अध्यात्म अजून विसरला नाही एवढे म्हणण्यास जागा आहे. नुकतीच अमेरिकेत पार पडलेली जगभरातील हजार-दीडहजार धार्मिक नेत्यांची परिषद हा त्याचाच एक भाग. मूठभर लोकांना का होईना पण जगभरातील धार्मिक (!) नेत्यांना जागतिक शांततेचा विचार सुचावा हा एक आशेचा किरण आहे. अर्थात परिषदा भरवून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही हे आपण सहजयोगी जाणतो. माणसाच्या आंतरिक शांततेमधून व त्याच्या आंतरिक परिवर्तनामधूनच या शांततेचा आविष्कार घडून येणार आहे.

विज्ञान व अध्यत्म यांचा पृथकपणे विचार झाल्यामुळे आजच्या काळात माणसासमोरचे प्रश्न अधिकच बिकट होत चालले आहेत अशी शंका येते. विज्ञानाला आलेली सध्याची प्रचंड गतिमानता हेही त्याचे एक आकर्षण आहे व त्याचा सामान्य लोक व विशेषतः तरुण वर्ग यांच्या मानसिकतेवर बराच प्रभाव पडत असल्याचे जाणवते. तसे पाहिले तर विज्ञानाचा कलही सृष्टीचे मूळ शोधण्याकडे असतो. नामवंत शास्त्रज्ञ आईनस्टाइनच्या म्हणण्याप्रमाणे विज्ञान व अध्यात्म दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि प्रज्ञापूर्व वैज्ञानिक दृष्टीकोनाला अध्यात्मिक बैठक असायला हवी. विज्ञान आणि अध्यात्म मूलतःच मानवाच्या हितासाठी असल्यामुळे त्यात विरोधाभास संभवत नाही; असे वाटणे हाच मुळी भ्रम आहे. अर्थात अध्यात्म म्हणजे लौकिक अर्थाने ज्याला धर्म किंवा धार्मिकता म्हणतात तो अर्थ इथे अभिप्रेत नाही.

जगभरांतील माणसांची सध्याची स्थिति पाहिली तर दिसून येते की एका बाजूने धर्माच्या नावाखाली चाललेले कलह, जाति-वर्णभेद, कर्मकाण्ड, फसवेगिरी, भोंदूपणा व लुटारूपणा आणि दुसऱ्या बाजुने वैज्ञानिक प्रगतिमधून विकसित झालेल्या लोकांमधील स्वार्थ, स्पर्धा, असुरक्षितपणा, विषमता, आक्रमकता, सत्तालालसा इ. गोष्टींचा वाढता प्रादुर्भाव या दोन्ही गोष्टींमध्ये माणूस भरडला जात आहे. भौतिक समृद्धि दिसत असली तरी सुख-शांति-समाधान हे मृगजळासारखे लांब व फसवे असल्याचे त्याला जाणवत आहे. माणसाच्या अंतरंगामध्ये मूलभूत परिवर्तन होऊन त्याला विवेक, संयम, व्यापक विचार, सह-अस्तित्व, प्रेम, दया, क्षमा, करुणा इ. मूल्यांची जोड मिळाली तरच मानवजातीचे कल्याण होणार आहे.

अवतरणस्वरुपांतील प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींनी नेमके हेच हेरून सहजयोग सुरू केला; गेल्या तीस वर्षांत जगभरांत तो सगळीकडे पसरला आहे. पण संपूर्ण मानवजातीची प्रचंड व्याप्ति लक्षात घेता त्याचा प्रचार व प्रसार अजून खूप मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी श्रीमाताजी समस्त सहजयोग्यांना सतत आवाहन करत आहेत. समस्त मानवजातीचा उद्धार साधण्यासाठी हाच अंतिम निर्णयाचा काळ असल्यामुळे सहजयोग्यांना स्वस्थ बसून चालणार नाही हा त्यांचा स्पष्ट संदेश आहे. जगभर सगळीकडे ''ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । भेटतूं भूता ॥'' असे सहजयोगी दिसून आले तरच श्रीमाताजींचे ध्येय व स्वप्न पुरे होणार आहे. त्याच कार्यासाठी आपण सर्वांनी कंबर कसून समर्पित भावनेने कार्याला लागणे हेच आपले सर्वांचे प्राथमिक व एकमेव कर्तव्य व जबाबदारी आहे.

* * *

# गुरू-पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### कबेला : २३ जुलै २०००

आज आपण गुरू-तत्त्वाची महानता समजून घेणार आहोत. गुरू आपल्यासाठी काय करतो हे पाहू या. तुमच्यामध्ये जे काही ऐश्वर्य जन्मापासून सिद्ध करून ठेवले आहे त्याचे ज्ञान गुरू आपल्याला करून देतो. तसे पाहिले तर हे ज्ञान, ही अध्यात्मिक संपत्ति, हा आनंदाचा ठेवा तुमच्या अंतर्यामी तुमच्याजवळच आहे, फक्त तुम्ही त्याला विसरून गेलेले असल्यामुळे गुरु तुम्हाला त्याची पुन्हा ओळख करून देतो आणि तुमच्या स्व-रूपाची जाणीव करून देतो. प्रत्येक मानव प्राण्यामध्ये आत्म्याचा वास आंतमध्ये आहेच आहे, जन्मापासूनच आहे, पण अज्ञानी असल्यामुळे तुम्ही तुमच्यातील हा अमोल ठेवा जाणत नाही. गुरू तुम्हाला त्याची ओळख व जाणीव करून देईपर्यंत तुम्ही मायेमध्ये अडकून बसल्याचे तुम्हाला समजत नाही. गुरूकडूनच हा आत्मप्रकाश तुम्हाला मिळू शकतो. काहींना हा प्रकाश लख्खपणे मिळतो तर काहींना तो कमी प्रमाणात. जगामधील सर्व धर्मांचे सार-तत्त्व हेच आहे की प्रत्येक मानवाने आपले स्व-रूप जाणले पाहिजे. धर्माच्या नावाखाली झगडे करणाऱ्यांना नेमकी हीच गोष्ट समजत नाही. प्रत्येक धर्माचा हाच पायाभूत विचार असला तरी सर्व-साधारण लोकांना अजूनही वाटते की देवपूजा, व्रत इ. कर्मकाण्ड पाळल्यावर ते देवाजवळ जाऊ शकतील. म्हणून ते आपल्या खऱ्या स्व-रूपाबद्दल अज्ञानी असल्यामुळे नसत्या गोष्टींमध्ये अडकून जातात. मग त्यांना वाटू लागते की सर्व काही पैशावरच अवलंबून आहे आणि पैसा मिळवण्यांतच त्यांना धन्यता वाटते. खरे तर त्यांच्या या भोळेपणाचा फायदा घेणाऱ्यांचे त्यामुळे फावते, त्यासाठी ते तुमच्या अहंकाराला खतपाणी घालतात आणि या मोह-मायाच्या जाळ्यांत अडकूनही तुम्ही स्वतःला धार्मिक समजता. पण याला धार्मिकपणा म्हणत नाही.

परमात्म्याला जाणण्याआधी तुम्ही तुमच्यामधील आत्मा जाणला पाहिजे. त्याच्याशिवाय दुसरा मार्ग नाही. हे ज्ञान होणे अत्यंत आवश्यक आहे आणि गुरूकडूनच ते तुम्हाला मिळणार असते. पण गुरु तुम्हाला सांगतो ते सत्य आहे की नाही हे ओळखण्याची क्षमता तुमच्याजवळ असली पाहिजे. यामुळेच उन्नतीच्या मार्गावर चाललेल्या अनेक साधकांना बऱ्याच अडचणी व प्रश्न येतात. त्यातील पहिला धोका म्हणजे तुमच्यामधील अहंकार. काहींना वाटते की त्यांना सर्व समजले आहे, आपण कुणी विशेष लोक आहोत व इतरांपेक्षा जास्त ज्ञानी आहोत. हे अहंकारात्मक अज्ञान फार घातक असते, भौतिकामधील अहंकारात चुकीच्या गोष्टींचे वाईट परिणाम होतात हे तुम्ही जाणत नाही. उन्नतीच्या चुकीच्या मार्गावर अर्धवट पोचलेल्या लोकांनी, आत्मसाक्षात्कार अजून प्राप्त न झालेल्या लोकांनी हे पक्के लक्षांत ठेवले पाहिजे की आपल्यामधील अहंकार संपूर्णपणे नाहीसा झाला पाहिजे.

**अहंकार घालवण्यासाठी आत्मपरीक्षण करणे फार जरुरी आहे; तसे करताना स्वतःकडे त्रयस्थपणे पहा, आपण कुठे चुकत आहोत ते लक्षात घ्या. त्यातून अहंकार झाल्याचे तुमच्या लक्षात येईल.** स्वतःलाच पारखून आपण कुठे कमी पडलो वा चुकलो किंवा विसरलो हे लक्षांत घेतल्यावर आत्मपरीक्षण सुरू होते. पण हा प्रयत्न प्रामाणिकपणे केला पाहिजे. काही लोक सहजयोगात आल्यावर थोड्याशा काळानंतर स्वतःला फार मोठे समजू लागतात, आपल्याला आत्मपरीक्षणाची जरूर नाही असे समजू लागतात आणि मग आपला आत्मसाक्षात्कार विसरून पुन्हा अज्ञानाच्या अंधारात शिरतात. म्हणून आत्मपरीक्षण करणे म्हणजे आपण कोण आहोत, काय करत आहो, आपली प्रगति किती झाली आहे इ. गोष्टी स्वतःच स्वतःकडे पाहून समजून घेणे. (यावेळी दुसऱ्याच कसल्या तरी कामांत गुंतलेल्या लोकांकडे पाहून श्रीमाताजी म्हणाल्या, "तुम्ही पूर्ण लक्ष ठेऊन माझे बोलणे ऐकले पाहिजे, समजले नाही तरी ते कार्य घडवून आणेलच.") असे केल्यावर माणूस हळूहळू पार बदलून जातो. उदा. एखादा आक्रमक प्रवृत्तीचा, शीघ्रकोपी व अहंमन्य माणूस एकमद शांत व मृदू स्वभावाचा होतो. तसेच एखादा भित्रट, सदैव शंकेखोर व निगेटिव्ह मनोवृत्तीचा माणूस धीट व आत्मविश्वासू बनतो. मग तुम्हाला योग्य मार्गावर चालत असल्याची खात्री वाटू लागते आणि मामुली गोष्टींमुळे तुम्ही

अस्वस्थ होत नाही. तरीही याच्यापुढे जाऊन तुम्हाला आणखी वर यायचे आहे, म्हणजे मगच ध्यानांमधून आपण कुठे कमी पडत आहोत हे तुमच्या लक्षांत येईल. तुम्ही आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतला आहे, परमात्म्याचे आशीर्वाद तुम्हाला मिळाले आहेत, तुमची प्रकृति उत्तम झाली आहे; एवढे झाले तरी अजून खूप प्रगति साध्य करणे बाकी असल्यामुळे सहजयोगाचे इत्यंभूत ज्ञान तुम्ही मिळविले पाहिजे. मग ते ज्ञान पारखण्याची क्षमताही तुम्ही मिळवली पाहिजे आणि ते ज्ञान आपल्याला किती जाणवले व समजले आहे हेहि तुमच्या लक्षांत आले पाहिजे. असे करू लागल्यावर तुम्ही भक्तीच्या प्रांगणात येता, मग तुमचे व्यक्तिमत्व अत्यंत हळुवार, नम्र, कमी बोलणारा, कुणालाही न दुखवणारा, दुसऱ्याला त्रास न होणारा असे बनते. मग तुम्ही सर्वांना सामावून घेणारे व हवे-हवेसे वाटणारे व्यक्ति बनता.

असे झाल्यावर तुमचे चित्त योग्य गोष्टींकडेच वळते व आपली वागणूक आपल्यामधील प्रेम व करुणेची शक्ति समजून घेता. एखाद्याबद्दल तुमच्या मनात निःस्वार्थ प्रेम असते तेव्हा त्याच्याबद्दल तुमच्यामध्ये आत्मीयता निर्माण होते. हे प्रेम शुद्ध असल्यामुळे अत्यंत आनंददायक असते. त्यामुळे त्या व्क्तीला तुम्ही समग्रपणे समजू शकता व त्याच्या अडचणींमधून व समस्यांमधून मार्ग काढू शकता. तशीच कुणी दुसरी व्यक्ति तुमच्या संपर्कात आली की तुम्ही त्यालाही समजावून व आपलेसे करुन घेता. **अशा स्थितीला आलेला योगी अत्यंत क्षमाशील असतो, त्याची क्षमेची शक्ति अमर्याद असते, त्यांच्या मनांत कुणाबद्दलही आकस उरलेला नसतो, राग नसतो.** येशू खिस्तांच्या जीवनात हे फार प्रकर्षाने दिसून येते. त्यांचा व इतर अनेक संतांचा छळ केला गेला, त्यांच्या काळी लोकांनी त्यांना मानले नाही; पण तरीही ते कुणावर रागावले नाहीत किंवा सूड उगवायचा वा शिक्षा देण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. उलट त्यांनी करूणा व क्षमाच वापरली. या करूणेपोटीच खिस्तांनीही त्यांना सुळावर चढवणाऱ्या लोकांसाठी परमेश्वराकडे क्षमेची याचना केली. ते सर्व थोर लोक करूणामय होते आणि म्हणून शांति-स्वरूप होते. सभोवार घडणाऱ्या कोणत्याही घटनांमुळे ते अस्वस्थ झाले नाहीत व सर्व काही परमेश्वराच्या इच्छेनुसार होणार आहे ही त्यांची श्रद्धा ढळली नाही, ते गुरुच्या व परमेश्वराच्या भक्तीच्या आनंदात रममाण होते; त्या उन्मादामध्ये ते सुंदर काव्य करत होते, भजन-गायनांत तल्लीन होत होते, प्रसंगी आनंदाने नाचत होते. कारण ते शांत होते व आनंदात न्हाऊन जात होते. त्यावेळी ते एकटे नव्हतेच कारण ते परमात्म्याशी पूर्णपणे एकरूप होते. परमात्म्याचे आशीर्वाद हाच त्यांचा आनंदाचा स्त्रोत होता.

आणखी एक विशेष म्हणजे त्यांना कसलेही आव्हान स्वीकारण्याची गरज वाटली नाही; त्यांना कसलीही काळजी नव्हती म्हणून ते कधी चिडले नाहीत; उद्या कसं होणार हा प्रश्न त्यांना कधीच पडला नाही. कारण ते भविष्याचा किंवा भूतकाळाचा विचार न करता सदैव वर्तमानात रहात; त्यामुळे ते शांत व निर्विचारी जागृतावस्थेतच असत. गुरू होण्यसाठी तुम्हीही ही स्थिती व क्षमता मिळवली पाहिजे. परमात्माच आपल्याकडून कार्य करवीत आहे ही श्रद्धा पक्की झाल्यावर तुम्हाला कधीच प्रश्न पडत नाही. एकदा अमेरिकेला जाण्यासाठी विमानतळाकडे निघतांना माझ्या समोररच एक लहान मुलगी पडली; मी शांतपणे तिच्यावर कार्य करू लागले, त्यात अर्धा तास गेला. पण विमानतळावर आल्यावर कळले की आमचे विमान रद्द झाले आहे व थोड्या वेळाने वॉशिंग्टनला जाणारे विमान आमच्यासाठी मिळणार आहे आणि मला वॉशिंग्टनलाच जायचे होते. **परमेश्वरी योजना अशी'सहज'-पणे कार्य करत असते. पण तसे होण्यासाठी परमात्म्याची भक्ति इतकी अनन्य, प्रखर झाली पाहिजे की त्या परमात्म्याला तुमच्या मदतीसाठी केव्हावी, कुठेही येणे भागच पडेल.** म्हणून हे नीट समजून घेऊन ध्यानात ठेवा की ही सर्वव्यापी शक्ति तुमच्या सर्वतोपरी कल्याणाची पुरेपुर हमी घेते; तिच्या कार्याला पूर्ण श्रद्धेने सहभागी झालात तर तुम्हीही माझ्याइतकेच शक्तिशाली बनू शकता. मग ही शक्ति तुम्हाला तिच्या कार्यासाठी सर्व साहाय्य करेल, त्या कार्यामधील तुमच्या अडचणी सहज दूर होतील. हीच तिची करुणा-शक्ति आहे. परमात्मा, परमेश्वर किंवा गुरू यांची करुणा शुद्ध असल्यामुळे सहजपणे कार्य घडवून आणते, त्यात कसलीही अडचण नसते म्हणून ती हमखास प्राप्त होते आणि तुम्हाला कसलाही प्रश्न पडत नाही. अगदी डोळे मिटून घ्यावे आणि घटित होते असे कार्य घडून येते. तुम्हाला कसला विचारही करावा लागत नाही; तुमचे आरोग्य, सोय-सुविधा इ. सर्व काही गोष्टी तुम्ही न मागता, पुरवल्या जातात. **जणू तुमच्या जीवनाची सर्व जबाबदारी ही शक्ति आपल्या शिरावर घेते; तुम्हाला कशाची खरी जरुर आहे. कोणती गोष्ट तुमच्या हिताची आहे. कोणत्या गोष्टीमुळे वा व्यक्तिमुळे तुम्हाला होणारा त्रास वाचेल अशी सर्व प्रकारची व्यवस्था ती करते.**

मला कधी कधी भेटायला येणाऱ्या व्यक्ति, माझ्या जवळच्या लोकांना फार निगेटीव्ह आहेत हे माहित असल्यामुळे काळजी वाटते तेव्हा अचानक काहीतरी घडून ती व्यक्ति येऊच शकत नाही. तुमच्या बाबतीतही असेच होत राहील आणि कदाचित काही चुकीच्या व निगेटिव्ह गोष्टी आढळल्या तर तुम्ही करुणा-शक्ति वापरा म्हणजे सर्व प्रश्न सुटतील आणि तुम्हाला अपाय होणार नाही. तुमच्या नातेसंबंधांतील, तुमच्या आजूबाजूच्या परिस्थितीत तसेच समाजामधील सर्व समस्या तुम्ही सोडवू शकाल.

आता तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर त्यामध्ये किती प्रगति केली आहे मला माहित नाही. मला काही वेळा सांगण्यात येते की महिला ध्यान करत नाहीत व स्वतःकडे नीट लक्ष देत नाहीत. काही पुरुषही असे आहेत. यावर उपाय म्हणजे तुम्ही करुणा-शक्ति वापरून त्यांना नीट समजावले पाहिजे. पुरुष जरी घराबाहेरच्या कामांत व्यग्र असला तरी स्त्रीलाही घरकाम, मुले-बाळे, स्वयंपाक इ. बऱ्याच सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळायच्या असल्यामुळे त्यांना ध्यानासाठी वेळ काढणे कठीण जाते. पण हे हि खरे आहे की ध्यान केल्याशिवाय प्रगति शक्य नाही. ध्यानामधूनच 'जे आहे' ते (सत्य-वर्तमान) तुम्हाला जमजते व त्याला तुम्ही पकडून ठेवू शकता. हळुहळु तुम्ही ध्यानामध्ये स्थिर व्हाल. तुम्हाला ध्यानाची गहनता समजेल आणि त्यांतूनच तुमच्या शक्ति सिद्ध होतील. मग निगेटिव्हिटी, कसलीही असली तरी तुमच्यापासून दूर पळून जाईल; तुमचे सर्व प्रश्न सुटतील, तुम्हाला काही भेट द्यायची इच्छा असेल तर तीही पुरी होईल. दिवसांतून दहा मिनिटे तरी तुम्ही ध्यान पूर्ण श्रद्धेने केले पाहिजे, ही श्रद्धा तुमच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग झाले पाहिजे. मग ही श्रद्धाच तुमचे जीवन व्यापून टाकेल अशी श्रद्धा निर्माण झाली की ती तुमच्या जीवनांत अनेक चमत्कार घडवून आणते. काही जणांना असेही अनुभव येतात की माझे नुसते नाव घेतल्यावर त्यांचे काम होते. पण याचा अर्थ असा नाही की त्यांना श्रद्धा आहे तर त्यांनी आणखी प्रगल्भ व्हावे म्हणून हे होत राहते. श्रद्धा ही मनाने निश्चय करून मिळवता येत नाही तर ध्यानामधूनच ती तयार होते. कोण ध्यान करत नाही हे मला लगेच समजते; ते तुमच्याजवळ येतील, सहजयोगाबद्दल वा माझ्याबद्दल बोलतील, लोकांवर छाप पाडून प्रसिद्धि मिळवतील पण तरीही आंतून ते गहनतेत उतरलेले नसतात. ही गहनता ध्यान व आत्मपरीक्षण यांतूनच मिळवता येते.

तुम्हाला जाणीवेच्या एका वरच्या स्तरावर यायचे आहे जिथे तुम्ही अडचणींमधून मार्ग काढू शकाल. **आत्मसाक्षात्कारी व्यक्तीची हीच एक खूण आहे की तो प्रश्न सहज सोडवू शकतो, मार्ग दाखवू शकतो.** या श्रद्धेमधूनच एक प्रकारची आत्मीयता व बंधुभाव निर्माण होतो. श्रद्धेशिवाय उन्नति व प्रगति नाही; ही श्रद्धा म्हणजेच तुमच्या आत्म्याचा प्रेमभाव असतो व तो सगळीकडे पसरतो. मग तुम्हाला समजू लागते. दुसऱ्याबद्दल तुम्ही वाईट बोलत नाही, दुसऱ्याचे दोष वा चुका दाखवीत नाही. दुसऱ्यावर टीका करणे ही वाईट खेळी आहे. उलट **स्वतःचे दोष पाहणे व ते सुधारण्याचा प्रयत्न करणे यात शहाणपण आहे; आणि ही तुमचीच जबाबदारी आहे.** त्याचबरोबर 'मला हे आवडत नाही, अमुकच आवडते' ही पाश्चात्यामध्ये बरेच वेळा आढळणारी भाषाही सोडली पाहिजे.

तुमच्यामधील आत्म्याला काय आवडते, तो कशामुळे आनंदी होतो याचे भाव ठेवा. आनंदाचा हा सागर तुमच्यामध्येच आहे आणि त्याच्यावर आनंदाचे तरंग उठू लागले की शब्दांनी वर्णन करता येणार नाही अशा अमृतधारांचा वर्षाव तुमच्यावर होत असल्याचा तुम्हाला अनुभव येतो. तो एक कृपेचा वर्षाव असतो. दुसऱ्याबद्दल तुम्ही असे प्रेम बाळगले, तुम्ही एक आर्जवी व प्रेमळ व्यक्तिमत्व झालात की **कसलाही ताण न येता तुमचे सर्व संबंध सुव्यवस्थित होतात.** कुणा सहजयोग्याबद्दल वाईट बोलणे आणि दुसऱ्या सहजयोग्याबरोबर त्याच्याबद्दल टीका करणे ही फार वाईट गोष्ट आहे. कुणाला काही त्रास असेल तर तुम्ही सामुहिकतेमधून त्याला मदत केली पाहिजे. **आत्मपरीक्षण करून स्वतःमधील दोष सुधारण्याचा जो प्रामाणिक प्रयत्न करतो तोच खरा सहजयोगी.**

तुम्ही सर्वजण आता आत्मसाक्षात्कारी झाले आहात. पण तुमच्यापैकी बरेच जणांनी अजून सहजयोगाचे पूर्ण ज्ञान मिळवलेले नाही. तुम्ही सहजयोगाबद्दल पूर्ण माहिती व त्याच्या प्रणालीचे ज्ञान मिळवले पाहिजे व त्याची खात्री करून घेतली पाहिजे. नुसत्या व्हायब्रेशन्सवरुन समोरच्या व्यक्तीला कसला आजार आहे हे एखाद्या डॉक्टरसारखे तुम्हाला ओळखता आले पाहिजे. अमेरिकेतील काही डॉक्टरांनाही हे पटले आहे व त्यांच्या हॉस्टिपलमध्ये सहजयोग सुरू करण्याबद्दल ते उत्सुक आहेत.

म्हणून तुम्ही आत्मसाक्षात्काराचे भान ठेवा, स्वतःकडे सतत लक्ष ठेवा आणि जाणून घ्या. एखादी पत्नी नियमित ध्यान

करत असते, पतीचे गुणदोष जाणते पण त्याबद्दल बोलत नाही, वाद करत नाही किंवा तक्रारही करत नाही. उलट त्याला क्षमा करून सांभाळते. त्यांतूनच पतीला तिच्या सहनशीलतेची जाणीव होऊन तिच्या उच्च स्थितीची कल्पना येते. माणसामध्ये अनेक दोष असतात, तो अनेक बाबतीत अपूर्ण असतो. उदा. पाश्चात्य लोक नीतीमत्तेबद्दल उदासीन असतात. पण तुम्ही लोक आता सामान्य राहिला नाहीत तर उच्च स्तरावर आलेले आहात. हा उत्क्रांतीचा प्रवास असतो. कधी कधी एखाद्या नवीन सहजयोग्याची स्थिति पुष्कळ वर्षे सहजयोग करणाऱ्या माणसापेक्षा चांगली दिसून येते. म्हणून आपण काय आणि कशासाठी शोधत आहोत हे नीट समजून घ्या; तुम्हाला स्व-रूप जाणायचे आहे हे विसरू नका आणि त्यासाठीच तुम्ही सहजयोग पत्करला आहे हे लक्षांत घ्या. तुम्हाला आत्मसाक्षात्काराची अनुभूति आली आहे तेव्हा ही कुण्डलिनीच सर्व काही करणारी आहे. म्हणूनच अनेक लोकांच्या दारु, सिगरेट, अंमली पदार्थ इ. वाईट सवयी एकदम सुटल्या, उत्तान कपडे व भडक पेहराव यांचे आकर्षण कमी होऊन साधा पण आदरणीय पोषाख स्त्रियांना आवडू लागला. आत्मसाक्षात्कारानंतर हे सर्व ज्ञान व शहाणपण तुम्हाला मिळते कारण ते मुळांत तुमच्यामध्येच होते आणि हे गुरूंच्या मार्गदर्शनातूनच घडते.

आता सहजयोगामधील आणखी एका कमतरतेबाबत बोलले पाहिजे. अलिकडे जगात धरणीकंप, पूर इ. अनेक संकटे बऱ्याच ठिकाणी आली; पण कुणाही सहजयोग्याचे त्यांत नुकसान झाले नाही हे तुम्हाला माहित आहे. पण ही संकटे येण्याचे कारण सहजयोग अजून खूप मोठ्या प्रमाणावर सामूहिक होऊ शकला नाही हे लक्षात घ्या. **सहजयोग अजून खूप मोठ्या प्रमाणावर पसरला पाहिजे; अजून खूप लोकांपर्यंत तो पोहोचला पाहिजे; म्हणून तुम्ही पूर्ण ताकद लावून त्या कार्याला लागले पाहिजे.** खिस्तांजवळ फक्त बारा शिष्य होते पण त्यांनी जीव ओतून अपार कष्ट घेतले. तुमच्याजवळ तशी तळमळ नसेल आणि सहजयोगाच्या प्रसारासाठी तुम्ही सर्वस्वी शरणागति व श्रद्धेने कार्य केले नाही तर ही सामूहिक संकटे दूर होणार नाहीत. तुमचे चित्त म्हणूनच इतर भौतिक व सांसारिक गोष्टींपासून दूर होऊन पूर्णपणे सहजयोगाच्या कार्याकडे लागले पाहिजे. कुठल्याही भोंदू गुरुच्या नादी लागलेले लोक दूरदूर पसरलेले असतात, रस्त्या-रस्त्यांवर नाच-गाणी करत त्यांची जाहिरात करतात; असे दिखाऊ लोक ठिकठिकाणी दिसून येतात. पण आपल्याला तसे लोक नकोत. तुम्ही वेगळे आहात, तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे, सहजयोगाचे सर्व ज्ञान मिळाले आहे, मग तुम्ही सहजयोगासाठी काय करत आहात हा मुद्दा आहे. तुम्हाला सहजयोग पसरवायचा आहे; बाहेर पडून तो लोकांना सांगा, सहजयोगा व्यतिरिकत त्यांच्याशी दुसरे काही बोलू नका. हे जोपर्यंत तुम्ही करणार नाही तोपर्यंत वर सांगितली सामूहिक संकटे व हानि थांबणार नाहीत. **तुम्हाला परमचैतन्याचे संरक्षण मिळाले आहे तर इतरांना वाचवायचे काम तुम्हाला केलेच पाहिजे.** साऱ्या जगाला तुम्हीच वाचवणार आहात. त्यासाठी तुमची करुणा कार्यान्वित होऊ दे. सामान्य लोक मुळांत चांगले असले तरी त्यांना चुकीची प्रलोभने दाखवून, भुरळ पाडून आपल्या जाळ्यांत ओढणारे भोंदू अ-गुरू व त्यांच्यामागे धावणारे लोक जगांत खूप ठिकाणी पसरलेले आहेत. हा मूर्खपणा तुम्हीच थांबवणार आहात. म्हणून तुम्ही न डगमगता, न कचरता, सहजयोगाबद्दल सांगत चला, परमचैतन्याच्या चमत्काराबद्दल बोलत रहा. लोकांना समजावून सांगा की जोपर्यंत ते अनीतिमान, हीन अभिरुचीच्या व लोकांना लुबाडण्याच्या मार्गापासून परावृत्त होत नाहीत तोपर्यंत ही सामूहिक संकटे थांबणार नाहीत. नाहीतर या दुष्ट लोकांवरचा परमेश्वराला अनावर राग आल्याशिवाय राहणार नाही. **तुमच्या वागण्यामधून, पद्धतीमधून, बोलण्यामधून लोक असे प्रभावित झाले पाहिजेत की सर्व मानवजातीला स्व-तत्त्वाची जाणीव करून देण्याचे आपले ध्येय साध्य होईल.** म्हणून तुम्ही कुठेही असला तरी हे कार्य करण्यासाठी तयार व सज्ज व्हा. मी सहजयोग एकुलत्या एक माणसापासून सुरू केला. आता तुम्ही खूप लोक आहांत; कसलीही शंका वा भीति न बाळगता, आत्मविश्वासाने, उघड-उघडपणे सहजयोग सांगत चला, अधिकाधिक लोकांची कुण्डलिनी जागृत करत रहा. त्यासाठी तुम्हाला कसल्या अधिकृत संस्थेची जरूर नाही. तुम्हीच तुमची शक्ति वाढवून सर्व लोकांपर्यंत तुम्हाला सहजयोग पोचवायचा आहे.

तुम्ही हे सर्व नीटपणे समजून घ्या आणि स्वतः गुरू बनून ह्या कार्यात यशस्वी व्हा.

सर्वांना अनंत आशीर्वाद

●●●

# ईस्टर पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### इस्तम्बूल २३ मार्च २०००

आज आपण येशू ख्रिस्तांच्या पुनरुथ्थानाची महान घटना साजरी करणार आहोत. त्यांच्याप्रमाणे तुमचेही पुनरुत्थान झाले आहे आणि तुम्ही परमचैतन्याच्या प्रेम-साम्राज्यात प्रवेश मिळवला आहे. तुम्हाला पुनर्जन्म मिळणार असल्याची अपूर्व घटना घडणार असल्याचे माहीत होतेच; पुष्कळांना त्याची कल्पना होती पण ते कसे घटित होणार हे कुणाला माहीत नव्हते. तुमच्यामधील सूक्ष्म अस्तित्वाची कुणाला जाणीव नव्हती; संतांनीही शुद्ध आचरणावर भर दिला पण ते सर्व कसे घडून येणे शक्य आहे हे कुणी सांगू शकले नाही. भारतातील काही फार थोड्या लोकांना त्याचे ज्ञान होते आणि आता तुमच्यामधून ते जगभरातील देशांमध्ये पसरत आहे.

तुमची स्वतःची आई असलेली ही कुण्डलिनी जागृत झाल्यावर तुम्हांला दुसरा जन्म देते आणि तुम्ही सर्वव्यापी परमचैतन्याच्या संपर्कात येता. पूर्वीच्या काळी याच्याबद्दल अनेक थोर पुरुषांनी सांगितले होते पण ते प्रत्यक्षात उतरायला आत्मसाक्षात्काराशिवाय दुसरा मार्ग नव्हता. तुम्ही आता ते मिळवले आहे हे तुमचे भाग्यच आहे. शिवाय तुम्ही पूर्वजन्मांपासून ती इच्छा बाळगल्यामुळे तुम्हाला ते मिळाले. त्यासाठी तुम्ही आधीपासूनच खूप साधना केली, तपस्या केली, पण आता या जन्मात त्यासाठी कुणाला कसला त्याग करायची जरुरी नाही. असे हे सहज-पुनरुत्थान आहे.

आता या देशातील मुस्लिम लोकही आपल्यामध्ये आल्याचे मला फार समाधान आहे. त्यांची मला नेहमीच काळजी वाटत असे कारण ते खूप चुकीच्या कल्पनांच्या जाळ्यामध्ये हरवल्यासारखे अडकले होते. आता कुराणांचीच गोष्ट बघा; कुराण मोहम्मदसाहेबांच्या पश्चात चाळीस वर्षांनंतर लिहिले आहे; तेव्हा त्यातील काही अवतरणांत कमी जास्त बदल होण्याची किंवा काही संदर्भ अस्पष्ट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आणखी काही ग्रंथ लिहिले गेले पण ते लिहिणारे लोक आत्मसाक्षात्कारी नव्हते. आता पर्शियन (फारसी) भाषेत लिहिलेल्या या ग्रंथामधील तत्त्वे समजणे अवघडच आहे. त्यामुळे त्यातील वचनांचा दुरुपयोग करणारे लोक पुढे आले. भारतातही हेच झाले. कबीरानेही अनेक कवितांमधून सहजयोगच सांगितला आहे. सर्व धर्मांमध्ये असेच घडले. पॉल या भयंकर माणसाने बायबलच्या नावाखाली अनेक खोट्या गोष्टी त्यात घुसडल्या व ख्रिस्तांच्या पुनरुत्थानाबद्दल काहीच सांगितले नाही. म्हणून ख्रिश्चन लोकांना अंतरात्मा, उन्नती वगैरे काहीच माहीत नव्हते. आजकालच्या कॅथलिक चर्चमध्ये धर्माच्या नावाखाली काय काय घाणेरडे प्रकार चालतात ते पाहिले तर तुम्ही चक्रावूनच जाल. म्हणून ते बोलतात, प्रवचनांत सांगतात व पुस्तकातून प्रसिद्धी मिळवतात त्यात सगळा दिखाऊपणाच असतो. हे सगळे पैसा-सत्ता मिळवण्याच्या मागे असलेल्या लोकांमुळे झाले. धर्मामध्येही त्यांना आपली सत्ता प्रस्थापित करायची होती.

अशा परिस्थितीतही सूफी लोकांनी या देशांमध्ये व इतरत्र जे कार्य केले ते वाखाणण्यासारखे आहे. त्यामुळेच लोकांना या भौतिक गोष्टींपेक्षा उच्च दर्जाचे काही तरी मिळवण्यासारखे आहे एवढी तरी जाण आली. खरे पाहिले तर परमात्म्याच्या कृपेमुळेच जगात सगळीकडे सत्य जाणणारे व सांगणारे लोक होऊन गेले. पण त्या बहुतेकांना खूप त्रास सहन करावा लागला; लोकांनीही त्यांचा खूप छळ केला. आजही तेच चालू आहे. म्हणूनच तुमच्यासारखे मुसलमान व इस्लामी लोक धर्माच्या कर्मकाण्डीपणाला सोडून देऊन इथे आलात याचा मला फारच आनंद वाटतो. उपास-तापास, यात्रा इ. कर्मकाण्डांनी काहीही मिळणार नाही शिवाय या कर्मकाण्डात अडकलेल्या मुसलमान लोकांमध्येही एकी नव्हती, खून करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. कारण पंथ आणि पंथाभिमान यांचे प्रस्थ माजले होते आणि ते चालवणारेही अज्ञानी होते; त्यांना सत्य समजले नव्हते.

म्हणून साधक लोकांनी सत्य प्रथम ओळखले पाहिजे नाही तर साधना-मार्गात हरवून जाण्याची भीती असते. मग त्यांना सांगितले तरी पटणे कठीण जाते. सत्य जाणले असे म्हणण्यासाठी त्याची प्रचीती असावी लागते. तुम्हा लोकांना तुमच्याच हातांच्या बोटांवर ते समजले पाहिजे. कुराणामध्ये म्हटलेच आहे की 'कियामा'चे वेळी (Ressurection) तुमचे हात बोलू लागतील. 'कियामा' आणि कयामत यांना वेगळे-वेगळे अर्थ आहेत कियामा म्हणजे पुनरुत्थान, कयामत म्हणजे विनाश. म्हणजेच हातावर चैतन्यलहरीमधून सर्व ज्ञान

मिळाले असे समजलेले मुसलमान हेच खरे मुसलमान. कुराणमधील या वचनांचा हाच अर्थ आहे. पण हे कुणी त्यांना समजावले नाही. त्याचप्रमाणे मक्केमधील काळ्या पाषाणाभोवती फेरी मारण्याचा अर्थही कुणी लक्षात घेतला नाही. फक्त कर्मकाण्डासारखे सर्व मुस्लिम हे करतात. पण हा दगड म्हणजे स्वयंभू शंकर आहे. त्याचा 'मक्केश्वर' म्हणून उल्लेख आमच्या पूर्वजांनी केला आहे. भारतातील ज्योतिर्लिंगासारखेच ते पवित्र स्थान आहे. हा कर्मकाण्डातील एक प्रकारचा दोष आहे. तीच गोष्ट ख्रिश्चन लोकांची. आजच्या दिवशी चर्चमध्ये जाऊन आपल्या चुका कबूल करायच्या, अपराधीपणा मानायचा अशी त्यांच्यामध्ये समजूत आहे. पण या चुका का केल्या हा विचार त्यांच्या मनात येत नाही. मग नुसत्या क्षमा मागण्याला काही अर्थ नाही. याला कारण म्हणजे त्यांना साक्षात्कार मिळाला नव्हता; तसे असते तर त्यांनाच त्यांच्या चुका समजल्या असत्या. सहजयोगी जर काही चुकीच्या गोष्टी करत असेल तर त्याला स्वतःला आणि दुसऱ्या सहजयोग्यांनाही ते समजते. तरीही ते चुका करत राहिले तर त्यांना सहजयोगातून बाहेर फेकले जाते आणि ती सहजयोगातील फार कडक शिक्षा आहे. अशा लोकांना परमचैतन्याचे आशीर्वादाला आपण मुकणार याचेच फार वाईट वाटते. ही शिक्षा तसे पाहिले तर सूक्ष्म आहे. वरवर विचार करणाऱ्याला त्याची तीव्रता जाणवणार नाही. पण सहजयोग म्हणजे परमात्म्याचे संपूर्ण आशीर्वाद, शांति, समाधान व आनंद आहे. मोहम्मदसाहेबांनी शांतिबद्दल खूप सांगितले, इस्लामचा अर्थही शरणागत असा आहे, पण इस्लाम धर्मीयांतच सर्वत्र अशांति दिसून येते, इस्लामच्या नावाखालीच रक्तपात होत आला आहे. म्हणून या लोकांनाही आता हे हळुहळु पटत आहे ही चांगलीच गोष्ट आहे. आता सूफी लोक जगात अनेक ठिकाणी आहेत, भारततही आहेत. 'सूफी' म्हणजे साफ, म्हणजेच पवित्र व शुद्ध, म्हणून त्यांना सगळीकडे ईश्वरी प्रेम, ईश्वरी शांति दिसत असते, म्हणून त्यांनी नेहमी शांतीचीच भाषा केली. खरे तर युद्ध हा मूर्ख माणसांचा उद्योग आहे आणि तो पूर्णपणे थांबला पाहिजे. स्वतःवर घातक हल्ला करणाऱ्याला ठार मारणे गैर नाही, पण युद्ध करून माणसांची हत्या करणे अशोभनीय आहे.

तुम्हा लोकांचे पुनरुत्थान झाले आहे म्हणजे तुम्ही आता उच्च स्तरावर पोचलेले मानव झाला आहात, सर्व विघातक सवयींचा व दुर्गुणांचा तुम्ही त्याग केला आहे, षड्रिपूपासून तुमची सुटका झाली आहे. **कुण्डलिनी जागृत होऊन तुम्ही परमचैतन्याच्या साम्राज्यात आलात की तुम्ही स्थिर होता, सत्य जाणल्याचे तुम्हाला समजते आणि मग तुम्ही परमचैतन्याच्या कार्याचे माध्यम बनता. हेच तुमचे पुनरुत्थान.** ईस्टर साजरा करताना अंडे देण्याची प्रथा आहे; अंड म्हणजे पुनर्जन्माचे द्योतक आहे म्हणजेच तुम्हाला पुनर्जन्म मिळून तुम्ही एक परिवर्तित, विशेष व अध्यात्मिकतेच्या उच्च स्तरावरचे लोक बनून जाता. अंडे देण्याचा हा अर्थ आहे. श्रीगणेशाच्या जन्मकहाणीमध्ये उल्लेख आहे की प्रथम ब्रम्हांड झाले (ब्रम्ह + अंड) आणि त्याचे दोन भाग होऊन एकातून महाविष्णु व दुसऱ्यातून श्रीगणेश निर्माण झाले. आता येशू ख्रिस्तही नेहमी हात उंच करून दोन बोटे - मधले बोट व तर्जनी- दाखवत तो संदर्भ पहा. ही दोन बोटे म्हणजे नाभी व विशुद्धि, म्हणजेच त्यांना सुचवायचे आहे की माझे पिता हे नाभीचे स्वामी अर्थात विष्णु आहेत व श्रीकृष्ण त्यांचेच अवतरण आहेत. श्रीकृष्णांच्या चरित्रांत त्यांचाच महाविष्णु म्हणून उल्लेख आहे. या सर्व गोष्टी वेगवेगळ्या काळात सांगितल्या असल्या तरी तुम्ही नीट लक्षात घेतले तर त्यांचा अर्थ समजेल. गणेश हेच ख्रिस्तांचे वडील व साऱ्या सृष्टीचे आधार आहेत असा उल्लेख आहे. श्रीगणेश कुण्डलिनीचा आधार आहेत व आईच्या पावित्र्याचे सदैव रक्षण करणारे आहेत. म्हणून ख्रिस्त हे मानवाच्या नीतिमूल्यांचे मूलतत्त्व आहेत; अर्थात त्याचा जीवनाधार आहेत. आणि ख्रिश्चन जीवन पद्धतीमध्ये याचाच अभाव आहे. काहीही केले, कसेही वागले तरी चालते, चर्चमधील पदाधिकाऱ्यांवरही वागण्याचे बंधन नाही. बाप्तिस्मा देणे म्हणजे पाद्राने डोक्यावर पाणी शिंपडणे एवढीच त्यांची समज. यात ख्रिस्तांनी म्हटल्याप्रमाणे दुसरा जन्म कुठे झाला? लहान मुले तर या विधीच्या वेळी खूप रडतात असे मी पाहिलेले आहे. ख्रिस्तांनी नीतिबद्दलच नेहमी सांगितले पण त्यांचे नाव घेणारे हे लोक कुठल्या थराला आले आहेत? त्यांच्यामध्ये 'नीति' हा शब्द नाही. हे कसे चालू शकते?

ख्रिस्त हे मूर्तिमंत नीतिमत्ता आहेत. शुद्धता व मांगल्य प्रस्थापित करण्यासाठी श्रीगणेशाची सर्वप्रथम निर्मिति करण्यात आली. आदिशक्तीला सर्वप्रथम शुद्धता व पावित्र्य प्रस्थापित करावयाचे होते. आदिशक्तीला अत्यंत पवित्र असे मानव, पावित्र्याचे तेज पसरवणारे मानव अपेक्षित आहेत. एखादा अस्वच्छ ग्लास ज्योतीवर ठेवला तर त्याच्यातून प्रकाश कसा बाहेर पडेल? म्हणून अपवित्र, भरकटलेली नजर असणारे लोक ख्रिस्तांचे शिष्य असूच शकणार नाही. शुद्ध व पवित्र दृष्टि असणारांच्या लोकांनाच परमेश्वरी प्रेमाचा आनंद समजू शकतो. सहजयोग्यांमधील परस्पर-संबंधांतही याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे. म्हणून ख्रिस्तांचे अनुयायी म्हणवणाऱ्या ख्रिश्चन लोकांनी जीवनामध्ये

नीतिमत्ता प्रामुख्याने पाळली पाहिजे; त्याचा आनंद मिळवला पाहिजे. **खिस्ताप्रमाणे पुनरुत्थान होण्यासाठी नजरेमधून सर्वप्रथम शुद्ध प्रेम पसरले पाहिजे; त्याला पाप, अभिलाषा, हाव वैगरेचा स्पर्शही नसला पाहिजे. हे सर्व दोष तुमच्यामधून पार नाहीसे झाले पाहिजेत.** पाश्चात्य संस्कृतीमध्ये हाच मुख्य दोष आहे की नीतिमान, चारित्र्यवान मनुष्य त्यांच्या कल्पनेत बसतच नाही. त्यांच्या कल्पनेत असा आदर्श मानव असू शकत नाही. असे अपूर्ण मानव हेच ते सत्य मानतात; खरे सत्य म्हणजे काय याची त्यांना जिज्ञासा नसते. आत्मसाक्षात्कार न मिळाल्यामुळे हे होते. मुस्लिम लोक त्याला 'हकीगत' म्हणतात. सत्य ही काही कल्पना नसते, त्याचे शाब्दिक वर्णन करता येत नाही, ते पाहण्याची गोष्ट नाही; सत्य हे 'होणे' आहे. (Being) तरच त्या सत्याचा तुमच्यामधून आविष्कार होतो; त्याचाच तुम्ही आनंद उपभोगता; मग असत्य, काल्पनिक वा अप्रतिष्ठित गोष्टींकडे तुम्ही ढुंकूनही वळत नाही. उलट तुमचे बोलणे-चालणे, तुमचे संबंध, तुमची वागणूक अर्थात तुमच्या जीवनातूनही तोच प्रकाश पसरतो व अध्यात्माची शक्ति प्रगट होते मग सर्व वाईट, विघातक प्रवृत्ति तुमच्या आसपास राहूच शकत नाहीत.

तेव्हा तुमचे आता पुनरुत्थान झाले आहे यात शंका नाही. तुमच्या हातांमधून तुम्हाला सर्व कळत आहे. म्हणून मी तुमच्यासाठी काही आज्ञा वा उपदेश करण्याची जरुरी नाही. तुम्ही प्रकाश आहात आणि 'स्व'तंत्र आहात. म्हणून तुम्हाला स्वतःच्याच प्रकाशात आता पुढे जायचे आहे. तुम्हाला आता इतरांचे पुनरुत्थान करायचे आहे. गांजलेल्या, दीन लोकांना तुम्हाला आधार द्यायचा आहे; भरकटलेल्या लोकांना मार्गावर आणायचे आहे; हे तुमचे परम कर्तव्य आहे. बाकी आजूबाजूच्या फालतू गोष्टींकडे लक्ष देऊ नका. **आपण कोण आहोत याचे सतत भान ठेवा. You have to know what you are 'निर्मल' मातेची तुम्ही मुले आहात. अर्थात तुम्ही आपल्या शुद्धतेची काळजी घ्या. तुमची सौंदर्य-दृष्टीही तशीच शुद्ध असू दे. त्याचा रसास्वाद निर्मल असू दे. मग तुम्हाला प्रेम-भावनेचा खरा अर्थ समजेल.** मी जसे तुम्हा सर्वांवर प्रेम करते तसे तुम्हीही सर्वांवर प्रेम कराल. विरोधी शक्तींची व व्यक्तींची फिकीर बाळगू नका कारण ते स्वतःचाही नाश ओढवणार आहेत. **साऱ्या मानवजातीचा पुनरुद्धार करणे ही तुमची जबाबदारी लक्षात ठेवा. तुम्हाला विश्वधर्म सगळीकडे प्रस्थापित करायचा आहे.** आपल्यामध्ये आता जगभरातील सर्व धर्मांचे लोक एकत्र आले आहेत, रुढ धर्मांच्या संकुचित प्रवृत्तीमधून ते आता बाहेर पडले आहेत. आजपर्यंत हिंदु, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध इ. सर्व धर्म आपापल्या संकुचित पंथाभिमानाने ग्रस्त झाले आहेत' सर्व त्याग करण्याच्या चुकीच्या धारणेमुळे त्यांची दशा वाईट झाली आहे व हातात काहीच पडले नाही. त्यामुळे त्यांच्याजवळ पुनरुत्थान करण्याची क्षमता उरली नाही. ती शक्ति तुमच्याजवळ आहे. पण अशा लोकांबरोबर वाद घालायची तुम्हाला जरुर नाही. तुम्ही विशेष लोक आहात एवढे लक्षात घेऊन तुम्ही आत्मविश्वासाने व निर्धाराने कार्याला लागा. तुम्ही साक्षात्कारी झालात, योगी झालात, तुमचे पुनरुत्थान झाले हे सर्व कशासाठी झाले याचे भान ठेवा. हीच पुनरुत्थानातून तुम्हाला मिळालेली शक्ति आहे. ती तुमच्या स्वतःसाठी नाही तर परमात्म्याच्या आशीर्वादाने जगभरातील मानवांना दिव्य स्थितीवर आणण्यासाठी आहे हे विसरू नका. जे योग्य लोक आढळतील त्यांच्याशी सहजयोगाबद्दल बोला, **अधिकाधिक लोकांना कुण्डलिनी जागृतीचा अनुभव कसा देता येईल इकडे लक्ष द्या व सतत प्रयत्नशील रहा.** त्यासाठीच तुम्हाला प्रकाश मिळाला आहे म्हणून तो प्रकाश इतरांना वाटण्याचे कार्य तुमचे आहे. बऱ्याच सहजयोग्यांनी या बाबतीत चांगले कार्य केले आहे व करत आहेत. **तुमच्यापैकी प्रत्येकाने हे कार्य केलेच पाहिजे तर तुम्ही खरे सहजयोगी. हीच तुमच्या आईची इच्छा आहे.** तुम्हाला हे काम करणे अजिबात कठीण नाही. त्यासाठीच तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे व तुमचे पुनरुत्थान झाले आहे. तसे झाले की पृथ्वीवर परमेश्वरी स्वर्गीय साम्राज्य येणारच आहे.

सर्वांना अनंत आशिर्वाद.

●●●

**आपापसात सहजयोगाशिवाय इतर विषयावर बोलणे टाळावे. शक्यतो श्री माताजींचा महिमा व त्यांचे कृपेमुळे आपल्याला किती लाभ झाला याची चर्चा व्हावी. त्यामुळे सर्वांच्या चैतन्यलहरी सुधारतील.**

# अमृतवाणी

.....तुम्ही वृक्षावरचे फळ तोडले आणि घरात पिकवले तर ते लवकर खराब होईल, ते जर वृक्षावरच राहिले तर त्याला विशिष्ट आकार येईल आणि योग्य वेळी ते पिकेल. त्याची चव जास्त चांगली होईल. त्या वृक्षाजवळ जे येतील त्यांना फळे मिळतील. वृक्षापासून अलग राहिलेले फळ लवकर नाश पावते. प्रत्येकामध्ये अशी सामूहिकता हवी.....

●

..... अंधारात आपल्याला काही दिसत नाही. पण प्रकाश आला की आपल्यामधील दोष आपल्याला दिसायला लागात. आपण सर्व एकाच छताखाली असल्याचे तुम्ही पाहता. या हॉलमध्ये काही प्रश्न असेल तर त्याचा प्रत्येकाला त्रास होणार असतो. हीच तुम्हाला आतमधून मिळणारी सामूहिक चेतना......

●

..... सहजयोग्यांचा धर्म वेगळा आहे, त्यांनी एकमेकांना सदा सर्वकाळ आधार द्यायचा आहे आणि काळजी घ्यायची आहे. एक सहजयोगी जेव्हा दुसऱ्या सहजयोग्यावर टीका करतो तेव्हा मी आश्चर्यचकित होते कारण तुम्ही एकाच पूर्णत्वाने अंग-प्रत्यंग असताना टीका कशी करू शकता? एक डोळा दुसऱ्या डोळ्यावर टीका करतो का? ..... तुम्हाला फक्त एकमेकांवर प्रेम करायचे आहे.....

●

.....आता सामूहिकतेबद्दल. तुम्ही प्रत्येकजण माझ्या शरीरातील पेशी आहात. आणि मी तुम्हाला जागृत केले आहे. तुम्हीच नाश पावलात तर माझे शरीरही नाश पावणार. हे सर्व तुम्ही पाहिलं आहे. तुम्ही आजारी पडलात तर मी पण आजारी होते. एक प्रकारे मी जास्त चैतन्य-लहरी पसरवते पण तुम्ही त्या शोषू शकत नाही. म्हणून मला त्रास होतो. तुम्ही त्या लहरी शोषून घेतल्या तर मला आनंद होतो.....

●

# नववर्ष-पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचा उपदेश १९९५

नवीन वर्षारंभ दिवसाबद्दल सर्वांना शुभाशिर्वाद.

नवीन वर्षारंभ दिवस सगळीकडे उत्साहाने प्रत्येक वर्षी साजरा केला जातो; पण त्या उत्साहाच्या भरात या दिवसाचे महत्त्व नजरेआड होते. त्यामुळे या शुभदिवशी नवीन वर्षामध्ये काही विशेष नवा उपक्रम वा गोष्ट करण्याचा विचार कुणाच्या मनात येत नाही. सहजयोग्यांची सामूहिकता आता खूप चांगली वाढली आहे. तुम्ही लोकांनी ध्यानामध्ये प्रगति साधली आहे **म्हणून नवीन वर्षात आपण सहजयोगासाठी काय करू शकतो इकडे तुम्ही आता लक्ष दिले पाहिजे.**

सर्वप्रथम आपल्या समाजाचे, राष्ट्राचे तसेच जगाचे सध्या महत्त्वाचे प्रश्न कोणते आहेत हे प्रथम जाणून घेतले पाहिजे व त्याबद्दल सहजयोगामधून आपण काय करू शकतो याचा विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने आपण शिया-मुसलमानांना सहजयोग समजावण्याचे आणि छत्रपति शिवाजी महाराजांचे अपूर्व कार्य व चरित्र पुन्हा एकदा सर्व लोकांसमोर आणायचे असे दोन उपक्रम सहजयोगांतून अलिकडे सुरू केले. त्यातून शिया बंधूंना व लोकांना धर्म म्हणजे काय हे नीट समजू शकेल; आदर्श राजाचे कर्तृत्व त्यांना समजेल. हे कार्य चांगले होत आहे दिल्ली व आसपासच्या लोकांनी यासाठी बरीच मेहनत घेतली आहे. त्याचबरोबर दुसरी गोष्ट म्हणजे **आपण सहजयोगांतील गहनता प्राप्त केली आहे का व सहजयोग्यांची संख्या वाढत असताना आपल्यामधील गुणवत्ता कमी होत नाही ना इकडे पण तुम्ही लक्ष दिले पाहिजे.** वेगवेगळ्या ग्रुप्समध्ये सामूहिक ध्यानधारणा ठीक चालते का हेही बघितले पाहिजे व प्रत्येक सेंटरमधून जवळपासच्या भागात जाऊन सहजयोग पसरवण्याचे कार्य पण चालले पाहिजे. त्याचप्रमाणे इतके वर्ष कार्य करताना आपण जे आश्रम ठिकठिकाणी बनवले आहेत त्यांची देखभाल व त्यांतील योग्य वाटणाऱ्या सुधारणा याबद्दलही जागृत राहून सतत विचार केला पाहिजे व त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे.

काही नवीन उपक्रम चालू करण्याचाही आपण नेहमी विचार करावा. सहजयोगाचे एखादे वर्तमानपत्र सुरू करण्याचे माझ्या मनात होते आणि तसा एक प्रयत्नही मुंबईमध्ये केला गेला. पण काही लोकांनी थोड्या चुका केल्यामुळे हा प्रयोग फार काळ चालला नाही. परदेशांतून निघणाऱ्या वार्ता-पत्रांचे भाषांतर करून एक बुलेटिनही इथे चालले आहे; पण त्यात परदेशातील बातम्याच मिळतात; म्हणून भारतातील सहजयोगाबद्दलही एखादे वार्ता-पत्र आपल्याला सुरू करता येण्यासारखे आहे. त्यामध्ये जागतिक संबंधातील समस्यांच्या संदर्भात सहजयोगाचा प्रचार करता येईल. असे तीन प्रश्न मुख्यतः माझ्यासमोर आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे शांति. आपण स्वतः शांत झालो तरच बाहेरची अशांति आपल्याला समजेल. आज सगळीकडे, देशा-देशांत, प्रांता-प्रांतांत गडबड व अशांति माजली आहे; त्याच्या मुळापर्यंतची कारणे शोधून त्यासाठी आपल्याला काय करता येण्यासारखे आहे याचा आपण विचार करू शकतो. उदा. चैचेन्यातील यादवीबद्दल मी रशियन सहजयोग्यांना विचारले तर त्यांच्या मतांना कुठेच कसली वाच्यता व प्रसिद्धी मिळत नसल्याचे त्यांना सांगितले. त्यांच्यामते सरंजामशाही व लोकशाही या दोन्ही व्यवस्था सारख्याच आहेत. लोकशाही व्यवस्थेमध्ये कुठलाही एक धर्म राजधर्म होऊ शकत नाही. त्यादृष्टीने आजकाल सर्व धर्म एकाकी (Exclusive) होत चालले आहेत. मुसलमान, यहुदी, ज्यू व ख्रिश्चन हे सर्व धर्म एकच ग्रंथ व एकच प्रेषित मानतात. पण वास्तवतः कुठलाही धर्म एकाकी किंवा एकटा नाही ही गोष्ट लोकांच्या लक्षात आणून दिली पाहिजे. मोझेस अब्राहमबद्दल बोलले होते, ईशामसी त्या दोघांबद्दल बोलले आणि मोहम्मदसाहेब अब्राहम व मोझेस व येशूबद्दल बोलले होते; तेव्हा कुठलाही धर्म एकाकी नसतो; पण ते तसे अट्टाहासाने मानले गेल्यामुळेच भांडणे व युद्ध झाली; म्हणूनच ते सर्वजण विश्वधर्म मानण्यास तयार नसतात. विश्वधर्मात जर ते आले तर ही अलगपणाची भावनाच संपून जाईल; मग लढाई-झगडे बंद होतील. तसेच भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानात गेलेल्या मुसलमानांना तिथे आपलेसे न केल्यामुळे भारतातच राहिलो असतो तर बरे झाले असते असे उशीराने समजून आले. खरे पाहिले तर या लोकांना इस्लामचा अर्थच समजला नाही; मोहम्मदसाहेबांनीही सांगून ठेवले होते की ''खुद को पहचाने बिगर खुदा को पहचाचना नामुमकिन है।'' त्यांच्यामधील आणखी एक चुकीची धारणा म्हणजे ते निराकारच मानतात, साकार त्यांना मानवतच नाही; पण हे मानले तर जमिनीवरून ते का लढतात हे त्यांच्याच लक्षात येत नाही. निराकारच फक्त मानायचा तर तोच प्राप्त करून घ्यावा हेही त्यांना समजत नाही. पण अशा लोकांना जर आपण नीटपणे संवादामधून समजावले तर आज ना उद्या त्यांच्या डोक्यात प्रकाश पडेल. मुसलमान लोक कडवे असले तरी आता हळुहळु ते सहजाकडे येऊ लागले आहेत.

मी स्वतः त्यांच्या इराणसारख्या देशात जाऊन त्यांना भेटले आहे, त्यांच्याशी बोलले आहे व बऱ्याच जणांनी हातावर थंड चैतन्य जाणवल्याचे कबूल केले आहे. म्हणून अशा लोकांपर्यंत, वर्तमानपत्र म्हणा, वार्तापत्र म्हणा, कसल्यातरी माध्यमातून आपल्याला पोचले पाहिजे. नाहीतर शतकानुशतके चालत आलेल्या चुकीच्या धारणांमुळे शेवटी त्यांचाच नाश होईल. तसे न होता ते हळुहळु का होईना 'सहजा'मध्ये आले तर ही अशांति संपेल.

वेगळ्या दृष्टीने या परिस्थितीकडे पाहिले तर दिसून येते की व्यक्तिगत स्तरावरही माणूस आज अशांत आहे. त्याची कारणे अनेक आहेत व ती पूर्वीपासूनच माणसांच्या महत्त्वाकांक्षा, असूया इ. सारख्या प्रवृत्तीमुळे निर्माण झाली आहेत. उजव्या बाजूची व्यक्ति सामान्यतः अशांत असते, डाव्या बाजूची व्यक्ति दुःखी असते. म्हणजे दोन्ही बाजूंनी माणूस अशांतच. माझ्या पुस्तकात मी सांगितलेच आहे की सहजमध्ये आल्यावर माणसामधील गुणसूत्रे (Genes) ठीक होतात, तसे झाल्यामुळे माणूस आपोआप शांत होतो. शांत झालेला माणूस इतरांनाही शांत करतो. तुम्ही लोक खेड्यापाड्यात जाऊन 'सहजयोग सांगता तेव्हा त्यांच्याशी बोलून, संवाद करून त्यांना शांतीचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. उत्तर भारतामधील आणखी एक प्रश्न म्हणजे तिथे स्त्रियांना फार वाईट वागणूक मिळते व त्यांना सतत दबावाखाली ठेवले जाते, त्यांना आदराची वागणूक कुणी देतच नाही. त्यामुळे त्या स्त्रिया शक्तिहीन झाल्यासारख्या वाटतात. तसे सहजयोगातही मला महिला एकूण कमजोर दिसतात, ध्यान वगैरेपेक्षा फालतू गप्पांत व टवाळक्या करण्यात त्या जास्त रुची घेतात, नाही तर आक्रमकपणे वागून अधिकार चालवतात. अशामुळे त्यांची शक्ती शीण होते हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. म्हणून सहजयोगी महिला व पुरुषांमध्येही शांती स्थापित झाली पाहिजे. तसे झाल्यावर मुलेही शांत होतील व कौटुंबिक जीवनातही शांति येईल. सहजयोगी पतिपत्नीमध्ये सहजीवन व सुसंवाद असलाच पाहिजे. तिथे झगडा होऊच शकत नाही. सहजयोगाच्या कार्यामध्येही पति-पत्नींनी एकमेकांशी चर्चा व सुसंवाद ठेवला पाहिजे. त्यासाठी कसल्याही गोष्टीबद्दल मनाकडून प्रतिक्रिया होणार नाही याची रोजच्या जीवनामध्येही काळजी घेणे फार चांगले. सहजयोग माणसे जोडण्यासाठीच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून जिथे-जिथे काही प्रश्न व बेबनाव असेल तिथे तिथे सामोपचाराने व समजूतदारपणे संबंध न बिघडता ठीक कसे होतील हे पहात चला.

आणखी एक गोष्ट तुम्ही लक्षात घ्यायची म्हणजे आता पुढचे कार्य तुम्ही स्वतः करायचे आहे. माझे आता वय झाले आहे, माझ्याकडून जेवढे होईल तेवढे मी आजपर्यंत केले आता मला विश्रांती कशी मिळेल हे तुम्ही पहायला हवे, उगीच 'आमच्याच गावी येऊन पूजा करवून घ्या, आमच्या देशात कार्यक्रम करू या' असले हट्ट माझ्यापाशी धरू नका. उलट 'माताजी तुम्ही जशी इच्छा असेल तसे करा, आम्ही तुमच्या आदेशाप्रमाणे कार्य करणार' असे म्हणायला शिका. तसेच कुणाला काही प्रश्न असतील, कुणी आजारी असेल तरी ते माझ्यापर्यंत मदतीसाठी आणू नका; तुम्हाला सर्व शक्ति मी दिली आहे तर तुमचे तुम्हीच ते प्रश्न सोडवायचा प्रयत्न करा. ती आता तुमची जबाबदारी आहे हे लक्षात घ्या. यासाठीच तुम्हाला सहजयोगाची पूर्ण माहिती हवी आणि तुम्ही अंतःकरण शुद्ध ठेवले पाहिजे. तुम्ही एका फार महान संस्कृतीतील लोक आहात याचे भान ठेऊन, त्या संस्कृतीची सभ्यता तुम्ही समजू शकता म्हणून मी हे तुम्हाला सांगत आहे. परदेशांतील सहजयोग्यांना म्हणूनच तुमच्याबद्दल आदर आहे. तसेच सहजयोगी महिलांनी जास्त मेहनत घेऊन जबाबदारीने, सूज्ञतेने वागले पाहिजे जेणेकरून त्यांचा मुलांवर व कुटुंबातील लोकांवर प्रेमळ अधिकार मानला जाईल व एकंदरीत समाज सुधारेल. स्त्री ही शक्ति आहे याचे भान राखून त्यांनी वागणे हे म्हणूनच महत्त्वाचे आहे. महिलांना एकतर सहजयोगाची नीट माहिती नसते आणि ज्यांना आहे त्या स्वतःला फार मोठे समजतात म्हणून त्यांच्यामध्ये संतुलन झाले पाहिजे. महिलांवरच चांगला समाज बनवण्याची जबाबदारी आहे.

आणखी एक गोष्ट मुलांबद्दल. मुलांची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे. त्यांच्याशी गप्पा मारणे, त्यांच्याशी संवाद साधणे हे जरुरी आहे. मुलांबाबत समाजामध्ये विचारांची देवाणघेवाण झाली तर त्याचा खूप फायदा होईल. मुलांमध्ये उद्धटपणा नसावा पण आपले विचार वा भावना नीटपणे सांगण्याची क्षमता पण असावी. त्यांच्या बोलण्याकडे मोठ्यांनी दुर्लक्ष करू नये; कारण मुले अबोधिततेमधून बोलतात म्हणून त्यांच्याशी बोलण्यामध्ये खूप आनंद मिळतो; तसेच ती संवदेनशील व सहज-समजूतदारपणे वागतात.

अशा तऱ्हेने धर्माच्या नावाखाली अशान्ति माजवणाऱ्या लोकांना समजावणे, समाज सुधारण्यासाठी, महिलांना जबाबदार बनवणे, अनाथांसाठी, दुर्बल-अपंगांसाठी, वृद्धांसाठी काय करता येईल याबद्दल जागृत व क्रियाशील होणे इ. कार्याकडे लक्ष दिल्यास समाजात सहजयोग्यांना प्रतिष्ठा मिळवता येईल. या दृष्टीने ही जबाबदारी सहजयोग्यांनी उचलली पाहिजे. यांतच तुम्हाला मिळालेल्या शक्तीचे सार्थक होईल.

आजच्या या वर्षारंभाच्या शुद्ध दिवशी वरील गोष्टी लक्षात घेऊन सहजयोगाची व्याप्ति वाढवण्याचा निश्चय सर्व सहजयोग्यांनी केला पाहिजे असा माझा संदेश आहे. तसे झाल्यावरच तुम्ही स्वतः, तुमचे कुटुंब, तुमचा समाज व देश या सर्वांना एक नवीन अर्थपूर्ण स्वरुप येणार आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

# सहजयोग सेमिनार २०००, पुणे

## दि. ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर

पुणे केंद्रातील महिला सहजयोगिनींनी आखलेला व आयोजित केलेला ''सहजयोग सेमिनार २०००'' पुण्यामध्येच ता. ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २००० या तीन दिवसांत यशस्वीपणे पार पडला. ओसवाल जैन-बंधू-समाज-कार्यालय हे सेमिनारचे स्थान प्रशस्त आवार व सुविधा असल्यामुळे सोयीस्कर झाले. या सेमिनान्तर्गतच एक दिवसाचा राष्ट्रीय युवा संघटनेचा सेमिनार घेण्यात आला. सेमिनारमध्ये एकूण उपस्थिती सुमारे ११५० होती, त्यामध्ये महाराष्ट्रामधून पुणे, मुंबई, नाशिक, फलटण, पनवेल, कोल्हापूर, संगमनेर, लातूर, जळगाव इ. ठिकाणचे सहजयोगी होतेच पण विशेष म्हणजे जबलपूर, इटारसी, विशाखापट्टम, हैद्राबाद, चेन्नई, कलकत्ता, अहमदाबाद, रांची, जयपूर, हरियाना, इ. दूरदूरच्या ठिकाणांहूनही सहजयोगी आवर्जून आले होते. एकूण वातावरण प्रसन्न व आनंददायक होते.

३० सप्टेंबरला सकाळी ११ वा. सेमिनारची सुरुवात प. पू. श्रीमाताजींच्या कमलचरणांच्या पूजेने झाली व त्यानंतर हवन झाले. भोजनानंतरच्या दुपारच्या सत्रांत ज्येष्ठ व पाहुणे सहजयोग्यांकडून मार्गदर्शन झाले. प्रथम **श्री. आर. डी. मगदुमसाहेबांनी** गणेश-तत्त्वाबद्दल व श्रीगणेश दैवतेबद्दल मौलिक मार्गदर्शन केले व त्याचबरोबर बीज-मंत्र, संस्कृति, ध्यान, गणेशतत्त्व व कुंडलिनी इ. चे महत्त्व विशद केले. चेन्नईचे लिडर **श्री. रेड्डी** व हैद्राबादचे लिडर **श्री. मोहनराव** यांची भाषणे झाली. त्यांनी सहजयोग-केंद्र-प्रमुखाचे (leader) कार्य व सामूहिकता, सहजयोग व वैद्यकशास्त्र, सहजयोग व होमिओपथी, सहजयोगाची विशेषता इ. विषयांवर मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रांत सांस्कृतिक कार्यक्रम झाले. त्यांत मुख्य भाग हैद्राबादहून आलेल्या सहजयोगी कलाकार व बाल-कलाकारांचा होता, त्यामध्ये भजन, संगीत, भरतनाट्यम् व कुचिपुडी नृत्य, युवाकलाकारांचे कार्यक्रम इ. सादर केले गेले. कार्यक्रमाचे शेवटी श्री. सिम्पल यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमधून सादर केलेल्या भजनांनी श्रोते हर्षोत्फुल्ल झाले.

दि. १ ऑक्टोबरच्या सत्रांत युवा-शक्ति सेमिनारही अंतर्भूत होता. सकाळी ध्यान घेण्यात आले. नंतरच्या सत्रांत राष्ट्रीय सहजयोग-प्रमुख **श्री. अरुण गोयल** यांनी मार्गदर्शन केले, आपल्या भाषणांत ते–

''घोर कलियुगाच्या काळामध्ये आणि भारतासारख्या पुण्यभूमीमध्ये आपल्याला सहजयोगामधून आत्मसाक्षात्कार मिळाला व अवतरणस्वरुपातील साक्षात् आदिशक्ती श्रीमाताजी निर्मलादेवींची अमृतवाणी कानावर आली हे सर्व सहजयोग्यांचे परमभाग्य आहे. ही महत्त्वाची गोष्ट नीटे समजून घेतली पाहिजे. शरीर-मन-बुद्धि-अहंकार या मिथ्या कल्पना कमी-कमी होऊन सतत आत्मसन्मुख राहण्याचा प्रयत्न करण्यातच आपले हित आहे आणि त्यासाठी ध्यान, चक्रांची स्वच्छता सहजयोगाच्या ट्रीटमेंटस् इ. काळजी घेतली पाहिजे.

त्याचबरोबर आपल्याला आत्मसाक्षात्कार फक्त स्वतःसाठीच मिळाला आहे अशी संकुचित भावना न बाळगता प्रत्येकाने सहजयोगाच्या कार्यासाठी झटले पाहिजे. सहजयोग घेतल्यावर आपले ऐहिक प्रश्न सुटले, आजार दूर झाले अशा प्रकारच्या कोणत्या गोष्टींवर समाधान मानून स्वस्थ बसलो तर आपला आत्मसाक्षात्कार व्यर्थ जाईल. साक्षात आदिशक्तीच्या अवतरणाकडून आपल्याला हे वैभव मिळाल्याचे महत्त्व म्हणूनच लक्षात घेऊन प्रत्येक सहजयोग्याने कार्याला लागलेच पाहिजे व जास्तीत जास्त लोकांना कुण्डलिनी जागृतीची अनुभूति देण्याचा ध्यास घेतला पाहिजे. हीच एकमेव दक्षिणा आपण श्रीमाताजींच्या चरणी अर्पण करू शकतो.

साधक समाजामध्ये सर्वत्र असतात व त्यांना आपण जाणले पाहिजे. वरवर चांगला दिसणारा माणूस साधक असतोच असे नाही, उलट व्यसनी व तुरुगातील गुन्हेगारही आतून

साधक असू शकतो. त्यासाठीच सहजयोग्याला चैतन्य-लहरींची शक्ती मिळाली आहे व त्याचा उपयोग केला पाहिजे. नाही तर दिव्याखाली अंधार अशी आपली अवस्था व्हायची. कार्यासाठी आपण प्रेम-शक्तीच वापरली पाहिजे व चैतन्याची परिभाषा ओळखून वागले पाहिजे व शुद्ध इच्छा ठेवून या परमेश्वरी कार्याला इन्स्ट्रुमेंट म्हणून वाहून घेतले पाहिजे. आत्मविश्वास बाळगून धैर्याने काम करणे हाच एक उपाय आहे. नवीन लोकांवर टीका न करता, ते सहजयोगात येण्यासारखे नाहीत अशी स्वतःची समजूत करून न घेता उलट त्यांच्याशी प्रेमाने वागले पाहिजे.

सहजयोगाच्या मर्यादा नीट सांभाळल्या पाहिजेत. कुठल्याही सहजयोगी/गिनीबद्दल पति/पत्नी या भावना बाळगणे वा स्वतःच पुढाकार घेऊन आपल्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करणे वा तशी अभिलाषा ठेवणे चुकीचे आहे. तसेच सहजयोगी बंधू-भगिनी एकमेकांत होळी खेळू शकत नाही. या सर्व मर्यादा व प्रोटोकॉल्स सांभाळून आपले लक्ष आपल्या उन्नतीकडे व गहनता मिळवण्याकडे लागले पाहिजे. त्यासाठी मूलाधार चक्र व्यवस्थित ठेऊन आपली बैठक बळकट केली पाहिजे. या सर्व कार्यामध्ये युवाशक्तीचा सहभाग व जबाबदारी जास्त आहे, म्हणूनच श्रीमाताजींचे चित्त आता युवाशक्तीकडे आहे हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. आपला सहजयोग, आपली कौटुंबिक जबाबदारी व आपली नोकरी/व्यवसाय/शिक्षण या सर्वांमध्ये संतुलन राखून, सहजयोगाच्या विरोधातील प्रचाराने विचलित न होता, प्रत्येकाने निष्ठेने कार्याला लागले पाहिजे. हाच श्रीमाताजींचा संदेश आहे.''



त्यानंतर युवाशक्तीकडून प्रकाशित होणाऱ्या NSYS Interactive Newsletter च्या पहिल्या त्रैमासिक अंकाचे प्रकाशन झाले. युवा मुला-मुलींना पुण्याचे माजी कलेक्टर **श्री. गौतम** यांनी मार्गदर्शन केले. भोजन पश्चात ''कौन बनेगा ज्ञानपति'' हा आगळा क्विझ् कार्यक्रम झाला व त्यामध्ये उपस्थितांनी उत्साहपूर्ण भाग घेतला. यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन व संचालन पुणे केंद्र प्रमुख **श्री. पुगालिया** यांनी स्वतःच केले. सायंकाळी ६ वा. आंतरराष्ट्रीय सहजयोग प्रमुख **श्री. योगी महाजन** यांनी दि. १ ऑक्टोबर २००० रोजी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ध्यानाच्या संभातील सत्-चित्-आनंद या स्थितीबद्दलच्या तत्त्व-संकल्पना विशद करताना ते म्हणाले–

''ध्यानामधून सतत बहिर्गामी असणाऱ्या चित्ताला स्थिर करायचे असते. म्हणून पातंजलीनी 'योगश्चित्तविरोधः' असे योगसूत्र सांगितले. पूर्वीच्या काळी सर्वसंगपरित्याग करून डोंगर-दऱ्यांत राहून अनेक ऋषीमुनींनी जीवनभर ही साधना केली. पण मनाने वैराग्य न साधल्यामुळे त्यांच्या जीवनात रस-आनंद न राहिल्यामुळे शुष्कता आलीच; पण त्याबरोबर क्रोध अनावर झाला. पण सहजयोगामधून कुण्डलिनी जागृत झाल्यावर तिच्याकडूनच साधकाचे चित्त आंत खेचले जाते. ही एक सहज घटित होणारी घटना असते; त्यासाठी काही धर्मकाण्ड करावे लागत नाही. सामान्य संसारी माणसाला कपडे-लत्ते,

राहणे, घरदार काही न सोडता सामान्य व्यवहार चालूच राहतात. पण भौतिक वस्तूंबद्दलची त्याची लालसा कमी होत जाते; आपल्या घरांमध्ये सोफा, सजावट इ. च्या मागे न लागता तिथे चैतन्य कसे वाढेल हे तो पाहतो आणि त्यातूनच त्याची कलात्मकता विकसित होते.

कुण्डलिनी जागृत झाल्यावर प्रवाहित झालेले परमचैतन्य हेच सत्य (सत्) असल्याचे आपल्याला जाणवते, कारण सत्य हाच चैतन्याचा आधार आहे. म्हणून कुण्डलिनी पुढे असत्य किंवा निगेटिव्हीटी टिकू शकत नाही. म्हणूनच सहजयोग्याने आपल्या चुकांचे समर्थन करण्याचा फंदात पडू नये. तसे केल्यास त्याच गोष्टी भूत बनून आपल्यामध्ये शिरतात. चुका न लपवता त्यांचा स्वीकार करणे बरे. मग कुण्डलिनी त्यांतून मार्ग काढते आणि कुण्डलिनी म्हणजेच आत्म्याबद्दल आपला विश्वास दृढ होतो तसेच नेहमीच्या व्यवहारातील व घरगुती गोष्टींबद्दल बाऊ करून त्यांच्याकडे प्रश्न वा अडचण म्हणून पाहू नये कारण तेही सर्व सुरळीत होणारच असते. परमचैतन्य हेच परमसत्य आहे हा आत्मविश्वास येत नाही. तोपर्यंत चित्ताची बहिर्गामी वृत्ति थांबत नाही. त्यासाठी लिव्हर व उजव्या स्वाधिष्ठानवर उपाय करावे लागतात. लहान मूल जसे रंगीत खेळण्याकडे आकर्षित होते तसे आजकालच्या आधुनिक जीवनप्रणालीमध्ये व प्रसार-माध्यमांनी बळकवलेल्या जाहिरात युगामुळे टीव्ही., मासिके, उत्तान चित्रे व पुस्तके यांचा प्रभाव पडून चित्त खराब न होऊ देण्याची काळजी आपण घेतली पाहिजे. पाश्चात्य देशांत या गोष्टी फार माजल्या आहेत. विशेषतः सहजयोगातील युवा-शक्तीने ही गोष्ट फार जपली पाहिजे.

चित्तामध्ये आत्मसाक्षात्कारानंतर प्रकाश पडला की चित्तशक्ती जागृत होते. ही चित्शक्ती कमालीची कार्यक्षम असते व साधकाची चेतना उन्नत करते. त्यातून साधकाची बुद्धी कुशाग्र होते, स्मृति तीक्ष्ण होते. संगणक पदवीधरांनी याचा फायदा मिळवला पाहिजे कारण भारतीय तंत्रज्ञांना परदेशांत फार मागणी आहे. या क्षेत्रामध्ये अशा कुशाग्र बुद्धीची जरुर आहे. चित्-शक्तीला पावित्र्य हवे असते व त्याच ठिकाणी ती कार्य करणार असते ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. चित्-शक्तीचे कार्य लेसर-किरणांप्रमाणे प्रखर व निर्णयात्मक तऱ्हेने होत असल्यामुळे कुठल्याही समस्येच्या मुळापर्यंत तो पोचतो व त्या दूर करते. किंबहुना या उन्नत चेतनेकडूनच परमचैतन्याकडे जरुर ते संदेश पोचवले जातात. श्रीमाताजी म्हणूनच त्यांच्या चित्ताकडून अशक्य गोष्टीही करू शकतात. आजकालच्या व्यवस्थापन क्षेत्रातील सर्व प्रणाली आक्रमकता व वरचढपणाच्या प्रवृत्तींना पोषक असतात, पण चित्-शक्ती कार्यरत झाली की त्याही गौण ठरतात. आणखी एक परिणाम म्हणजे आपले चित्त एक आरसा बनते व त्यामध्ये सर्व काही स्पष्ट प्रतिबिंबीत होते; अर्थात स्वतःच्या व दुसऱ्या व्यक्तीच्या असत्य व चुकीच्या गोष्टी उघड पडतात.

ध्यानामधून मिळणारा आनंद ही एक शब्दांनी वर्णन करता न येण्यासारखी अनुभूति आहे. हा आनंद आपल्याला आत्म्याकडून मिळत असतो. या आनंदाचे परिवर्तन आपल्या हृदयातील प्रेमशक्ती प्रवाहित होण्यात होते. हे खरे प्रेम असते कारण ते दुसऱ्यासाठी व त्याचे भले होण्यासाठी असते. फूल जसे स्वभावतःच सुगंध पसरवते, तो त्याचा धर्मच आहे, तसे आपले व्यक्तिमत्व बनते. प्रेमाच्या पोटी मग करुणा आलीच, म्हणूनच श्रीमाताजींची 'सांद्रकरुणा' या नावाने आपण स्तुती करतो. मग आपोआपच आपण क्षमाशील बनतो.

अशा तऱ्हेने सत्-चित्-आनंद या अवस्था परिणत झाल्यावर साधक उच्च मानवस्तरावर येतो. मग सत्य काय व भ्रम काय हे आपल्याला नेमके समजू लागते; त्याची परमचैतन्याच्या संवदेनांची जाणीव तीक्ष्ण होते. प्रवाहित झालेल्या परमचैतन्याचे सर्व फायदे

मिळू लागतात; जगाचे मिथ्या-स्वरूप सक्रमणे, सर्वांबरोबर प्रेम व करुणापूर्ण वृत्तीने वागणे, सामूहिकतेबरोबर राहून सहजयोगाचा प्रसार करणे, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमध्ये परमेश्वराच्या लीलेची प्रचीती येणे, उगीचच गंभीर वा सीरियस न होता सर्वांबरोबर आनंद मिळवणे व कलानिर्मितीमध्ये प्रावीण्य मिळवणे असे अनेक फायदे मिळतात.

ध्यानाच्या प्रगतिसाठी मूलाधार चक्र स्वच्छ होणे महत्त्वाचे आहे, ही बैठक प्रयत्नपूर्वक जमली पाहिजे. कारण श्रीगणेशाकडून प्रवाहीत होणारी ॐ-शक्तीच आपल्याला मार्गदर्शन करणारी आहे विशेषतः मूलाधार चक्र, भवसागर व आज्ञा यांच्या संदर्भात तीच आपल्याला आपल्या चुका दाखवते. श्रीमाताजी आपण क्षमा मागताच माफ करतात पण आतील प्रगती व उन्नति प्रत्येकाने स्वतःच साध्य करून घ्यायची आहे. त्यासाठीच सहजयोगाच्या मर्यादांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. ध्यानाची गहनता व उन्नत स्थिती मिळवण्याच्या आपल्या प्रयत्नांवर ही ॐ-शक्तीच मदत करणारी असल्यामुळेच सतत आत्मपरीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. चित्-शक्ती उन्नत झाली की तिच्या मदतीने तुम्ही सर्व जटिल प्रश्न व सामाजिक वा राष्ट्रीय प्रश्न सोडवू शकाल कारण तिच्यामध्ये व्यक्ती, वातावरण, समूह अशा सर्वांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे."

वरील मार्गदर्शन सुलभ होण्यासाठी कॉम्प्युटर-प्रोजेक्टरच्या साह्याने पडद्यावर चित्रकृती दाखवल्या गेल्या. तसेच चैतन्याची प्रवाह-प्रतिक्रिया, सहजयोगाची जागतिक स्थिती वगैरे भाग चार्टस्-द्वारा स्पष्ट केले. त्यामध्ये शक्ती, प्रेम व करुणा भावांनी ओथंबलेले श्रीमाताजींचे तीन सुंदर फोटो पडद्यावर पाहिल्यावर श्रोत्यांना फार समाधान झाले.



यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम झाले व शेवटी हैद्राबादहून आलेल्या कवालांनी कवाली सादर केल्या.

दि. २ ऑक्टोबर या शेवटच्या दिवशी सकाळी ध्यान झाले. त्यानंतर प्रसिद्ध व सहजयोग्यांचे आवडते शास्त्रीय संगीत कलाकार श्री. अरुण आपटे व्यासपीठावर आले. त्यांनी पहिल्याच रागदारीमध्ये आळवलेल्या मंत्रामधून चैतन्य प्रभावी झाल्याचे सर्वांना जाणवले. त्यांनी संगीत व सहजयोग हा संबंध विशद करून सांगितला व श्रोत्यांकडून स्वर लावून घेऊन त्यांना प्रत्यक्ष जाणीवेची अनुभूति करून दिली. तसेच भजन म्हणून श्रोत्यांना अपार आनंद व चैतन्य मिळवून दिले. त्यानंतर विविध कलाकार व बालकलाकारांनी विविध कार्यक्रम साजरे केले. त्यामध्ये जेजुरी केंद्रातील मुलांनी सादर केलेले "मुरळी नृत्य-गीत", पुण्यातील मुलांनी सादर केलेले 'विराट-सभा' हे बालनाट्य, जेजुरीच्या मुलांचे लेझिम नृत्य यांचा उल्लेख केला पाहिजे.

सर्व कार्यक्रम संपल्यानंतर सेमीनारचा समारोप करताना प्रथम दिवंगत महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्रीय जयंती-निमित्त त्यांना स्मृतीवंदन केले. त्यानंतर वंदेमातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून प. पू. श्री माताजींच्या आरतीनंतर समारोप झाला. त्यावेळी पुण्याचे केंद्रप्रमुख **श्री. पुगालिया** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

★ ★ ★

# भक्ति आणि कर्म

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

दिल्ली २१-२-८६

दिल्लीमधील सत्य शोधणाऱ्या सर्व साधकांना नमस्कार.

आजकाल आपल्यासमोर मानवी-जीवनासंबंधी अनेक प्रश्न आहेत. आपल्यामध्ये जो बौद्धिक वर्ग आहे त्या लोकांना वाटते की आजपर्यंत झालेल्या अवतरणांनी हे कार्य का नाही केले? याला काय उत्तर देणार? वृक्ष जेव्हा बीजापासून तयार होतो त्या प्रक्रियेत अनेक अवस्था असतात. म्हणून मी नेहमी हेच सांगते की सध्याचा काळ हा बहराचा समय आहे आणि या काळांतच माणसाला त्याच्या पूर्व-पुण्याईची फळे मिळणार आहेत. हे फार पूर्वीच सांगितले गेले व लिहिलेलेही आहे. नल-दमयंती आख्यानामधेही हे सांगितले आहे की कलियुगामध्ये कलीने नलाचा पत्नीपासून विरह घडवून आणला व त्याचप्रमाणे लोकांना भ्रमामध्ये गुंतवून सर्वनाशाकडे पाठवले या दुष्कृत्याची शिक्षा म्हणून नल कलीचा वध करण्यास सिद्ध झाला, तेव्हा कली त्याला म्हणाला की या घोर कलियुगामध्येच सर्वसाधारण सामान्य पण विशेष संसारी लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवण्याची संधि मिळणार आहे आणि हाच कलीचा महिमा आहे. मग नलाने क्षमा मागून त्याला सोडले. या कलियुगातही काही अवतरण पृथ्वीवर आले पण हे कलियुगच इतके घोर आहे की मोठ्या प्रमाणावर हे कार्य होऊ शकले नाही.

दुसरा एक प्रश्न उठतो की एका स्त्रीलाच माता म्हणून हे कार्य का करावे लागत आहे. कुणी पुरुष का नाही करू शकणार? याचे कारण म्हणजे **लोकांना दुसरा जन्म प्राप्त करून देण्याचे हे कार्य असल्यामुळे एक आईच ते करू शकते.** हे कार्य करण्यासाठी खूप प्रेम, तळमळ व समजूतदारपणा बाळगावा लागतो. संयमही लागतो. यावेळी जर श्रीकृष्ण असते तर दिल्लीमधीलच अर्धे लोक त्यांच्या सुदर्शनचक्राचे बळी ठरले असते. म्हणून हे कार्य करण्याची उत्कट इच्छा निरंतर असली पाहिजे. श्रीराम, येशू ख्रिस्त, बुद्ध, महावीर हे पण हे कार्य करू शकले नसते. हे कार्य एक माताचे करू शकते. आपल्या देशांत स्त्रीला जितके आदराचे स्थान द्यायला पाहिजे तितके दिले जात नाही. उत्तर भारतात तर ही परिस्थिति फार वाईट आहे. ''यत्र नार्याः पूज्यंते। रमन्ते तत्र देवताः॥ हे वचन तुम्हाला माहित आहेच. पण इथल्या महिला जेव्हा पुरुषासारखे वागू लागतात तेव्हा स्वतःच्या स्त्रीत्वाची जाणीव विसरून पुरुषीपणाचे स्वभावधर्म दाखवू पाहतात. हे एक प्रकारचे कठीण काम आहे. ही कुण्डलिनी तुमची प्रत्येकाची स्वतःची आई आहे व पुत्राला पुनर्जन्म देण्यासाठी ती सदैव वाट पाहत असते. म्हणून ती जागृत झाली पाहिजे व तेही सामूहिक प्रकारे होणे जरूर आहे. पूर्वीच्या काळी असे आत्मसाक्षात्कार प्राप्त झालेले थोडेफार लोक होते. मला कुणाशी वादविवाद वा भांडण करायचे नाही. आईची एकच इच्छा असते की तिने प्रेमाने तयार केलेले जेवण खाऊन पुत्राने तृप्त व्हावे. ही एक सरळ, सहज गोष्ट आहे.

हा विषय सूक्ष्म व गहन आहे म्हणून सुरवातीला लोकांना इकडे वळवणे हीच अडचण येते. थोडा वेळ स्थिर होणे अवघडच होते, मगच एकाग्रता व नंतरची समग्रता अनुभवता येते. म्हणून माझी विनंति आहे की तुम्ही सर्वांनी थोडा वेळ मी काय सांगते ते नीट लक्ष देऊन ऐका. शास्त्रीय प्रणालीमध्ये प्रथम एखादी गोष्ट वा सिद्धांत गृहीत धरला जातो व नंतर प्रयोग केल्यावर तो सिद्ध झाला तर त्याला मान्यता मिळते. याच तत्त्वानुसार तुम्ही कुण्डलिनी आणि सहजयोग यांचा विचार केला पाहिजे. विरोधच करायचा अशी भावना बाळगल्यास काहीच अर्थ रहात नाही. नुसती वादावादी करून पदरांत काहीच पडत नसते. आणखी एक म्हणजे जो लोकांना भ्रान्तिमध्ये आणतो त्याचेच लोक जास्त ऐकतात. कारण पुन्हा हे कलियुगच. नुसते नाम देणारा गुरू कधीच खरा प्रामाणिक नसतो. एखादा चक्राचा त्रास असला आणि त्या देवतेचे नाम दिले तर त्याला थोडाफार अर्थ असेल. मला तुम्ही त्याबाबतीत प्रश्न विचारलेत तर मला आनंदच होईल. जेवायला बोलवायचे तर नुसते जेवणाच्या पदार्थांची नावे सांगणे याला काय अर्थ? तसेच हे आहे. शिवाय आपल्या देशांत अ-गुरूंचे फार प्रस्थ माजले आहे, मंत्रमुग्ध झाल्यासारखे लोक त्यांच्यामागे धावत राहतात व पैसे उधळतात.

आता भक्तीबद्दल मी बोलते. सर्व प्रथम मला हे सांगायचे आहे की तुम्ही गुरू करण्याच्या फंदांत न पडता स्वतःचेच गुरु व्हायला शिका. पूर्वीच्या अनेक संत व थोर पुरुषांनी तुमच्यातील गुरू-स्थान सिद्ध करून ठेवले आहे. त्याच्यावर तुम्ही अधिष्ठित व्हा. त्यातूनच तुम्ही स्वतःचे व दुसऱ्याचेही

संचालन कराल व त्यांना मदत कराल. तुमच्या कपाळावर एकादश-रुद्र हे फार कडक दैवत असल्यामुळे कुणापुढे ही डोके टेकवण्याची तुम्हाला गरज नाही. मंदिरातील कसल्याही पुजाऱ्यापुढे वाकून नमस्कार करण्यामुळे व त्यांच्याकडून टिळा लावून घेतल्यामुळे त्यांच्या बाधा तुमच्यामध्ये येण्याची व तुम्ही आजारी पडण्याची शक्यता असते. भक्तीमधील या चुका तुम्ही समजून घेतल्या पाहिजेत. भक्ति म्हणजे अंधश्रद्धा नव्हे. खरी श्रद्धा आत्मसाक्षात्कार झाल्यावरच येते. माझ्या पाया पडायला म्हणूनच मी लोकांना मना करते. गुरु नानकसाहेबांनी सुद्धा आत्मसाक्षात्कारी संताचीच वचने आपल्या गुरूग्रंथांत समाविष्ट केली; म्हणूनच त्या ग्रंथसाहिबासमोर माथा टेकायला ते सांगत. मोहम्मदसाहेबांनीही हेच सांगितले. वाटेल त्या गुरूच्या प्रभावाखाली येऊन लोक फक्त आजारी पडणार. भक्ति नेहमी डोळस असावी. नाही तर नुसती भोळी भक्ति काही उपयोगाची नाही. पण चांगले-चांगले लोक, सरकारी अधिकारी व मंत्रीसुद्धा विभूति काढणाऱ्या ढोंग्याच्या पायाशी येतात याला काय म्हणायचे? महिला तर याबाबतीत वाट्टेल त्या प्रकारांना बळी पडतात; मंदिरामध्येही वाट्टेल ते धंदे चालतात. परमात्मा शुद्ध व पवित्र असतो, मग त्याच्या नावांखाली चालणारे असले गलिच्छ प्रकार तो कसे सहन करणार? म्हणून भक्ति सर्व प्रथम डोळस झाली पाहिजे. नाही तर ती भक्तीची विडंबना होईल.

मी नेहमी सांगतो की **भक्ति अनन्य झाली पाहिजे. ही अनन्यता मिळवण्यासाठी आधी आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतला पाहिजे.** दुसरी गोष्ट उपास-तापास करण्यासंबंधी. कुठल्याही दिवसाचा कसला ना कसला उपास चालला असतो. कुठल्या देवाने उपास करायला सांगितला मला माहीत नाही; कुठल्याही शास्त्रांत तसे सांगितल्याचेही मला माहीत नाही. देवाच्या जन्मदिवशी उपास केला तर समजू शकतो पण एकूण **भक्तीचे हे स्तोम माजवणारे प्रकार बेकार आहेत; त्यामध्ये भक्तीची खरी अनन्यता नाही व गहनता पण नाही. त्यासाठीच आत्मसाक्षात्कार हवा.** एरवी पुरातन काळापासून चालत आलेल्या या भक्तीच्या नानाविध प्रकारांमुळे आपल्यामधील देवता नाराज होतात. भक्तीचा असा विपर्यास केल्यावर त्यातून काय मिळणार?

भक्तिमध्ये अनन्यता आल्यावर ध्यानाचा आनंद खऱ्या अर्थाने मिळतो. त्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात; त्यालाच निरानंद म्हणतात. ''जब मस्त हुअे तब क्या बोले'' याचा हाच अर्थ. आश्चर्य एवढेच वाटते की सर्व साधु-संतांनी हे खूप प्रकारे सांगितले असले तरी ते प्रकार संपत नाहीत; कबीर, नानक, तुकाराम, रामदास सर्वांनी परखड शब्दांत त्याच्यावर टीका केली आहे. लोकांचा विश्वास असला तरी त्या विश्वासाला अर्थ नाही.

दिल्लीमध्ये आजकाल तांत्रिक मंडळींचे प्रस्थ फार माजले आहे. आपल्यापेक्षा वरचढ असणाऱ्या माणसाचे पाय खाली खेचण्यासाठी त्यांच्या मागे लोक लागतात. पण त्यांची विद्या ही राक्षसी (असूरी) विद्या आहे व तिच्या मागे लागलेल्यांचा सर्वनाशच होणार असतो. त्यांच्या जवळसुद्धा फिरकू नका. परमात्म्याच्या नावावर तंत्र करणे म्हणजे परमात्म्याचा अपमान. भक्तीमध्ये अपार सामर्थ्य असते. म्हणून तुकाराम म्हणले अणुरणीया (थोकडा)। तुका आकाशाएवढा ॥ असे झाले म्हणजे 'मी' संपला; हीच अनन्य भक्ति. विरह-गीत गाणारे खूप असतात पण मीलन-गीत आत्मसाक्षात्कारीच गातात. हा अधिकार तुम्हाला मिळवायला पाहिजे. आत्मसाक्षात्कारी पुरूषाचे विचार आणि बोलणे निष्ठापूर्वक असते. निवडणुकीसाठी मते मागणाऱ्या उमेदवारासारखे वरवर बोलणे तो करत नाही. म्हणून खिस्तांसारख्या अवतारी पुरूषाच्या शब्दामध्ये शुद्धता व पावित्र्य असते; एका साधारण वेश्येला लोक निर्दयतेने दगड मारत असल्याचे पाहून त्यांनी लोकांना खडसावले व म्हणाले ''ज्या कोणी कधीच पाप केले नसेल त्याने प्रथम हिला दगड मारावा.'' साक्षात्कारी पुरुषच अशा अधिकारवाणीमध्ये बोलू शकतो.

भक्तिमार्ग व कर्ममार्ग या दोन्ही मार्गानी मनुष्य परमेश्वराला प्राप्त होतो असे श्रीकृष्णांनी सांगितले ते या दोन्हीच्या पलिकडे जे ज्ञान आहे ते मिळवण्याचा हेतू समजावून देण्यासाठी. ज्ञानी म्हणजे पंडित किवा ग्रंथ मुखोद्गत असणारा पुजारी नाही तर ज्ञान हे ज्ञानी माणसाला नसा-नसांमधून जाणवत असते. सृष्टीमध्ये ऋतूंचे नियंत्रण करणारी व सर्व जिवंत कार्य चालवणारी जी शक्ति चराचरामध्ये पसरून राहिली आहे तिचे हे ज्ञान. **भक्ति आणि कर्मांच्या संयोगातूनच ज्ञान मिळवता येते; अर्थात भक्तिमधून कर्म झाले पाहिजे; कर्म व भक्तिमध्ये फारकत उपयोगाची नाही;** म्हणजे श्रीराम-भक्ति करणाऱ्याने आपल्या जीवनांत मर्यादापुरुषोत्तम श्रीरामांचे गुण कसे उतरतील हे शिकणे. काया-वाचा-मनामध्ये ते गुण उतरले पाहिजेत. सहजयोगामध्ये इडा-पिंगला नाड्यांचे जे कार्य मन (संस्कार) व अहंकार (क्रिया) यांच्याद्वारे चालते त्यांच्यात संतुलन झाल्यामुळे टाळूवर स्पंदने होत असल्याचे जाणवते. म्हणून भक्ति वा अहंकाराचा एकांगी अतिरेक झालेल्या मनुष्याला जागृति मिळण्यास वेळ लागतो. ज्याची भक्ति करतो त्याच्यासारखे कर्म करणे हा खरा धर्म, नाही तर सारा मूढपणाच. म्हणून भक्ति करतानाही भक्तिमध्ये दोष येता

कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. ज्ञानेश्वरांनी भक्तिबरोबर ध्यानयोगही सांगितला तो न समजता नुसते त्यांची मंदिरे बांधून टाळ-भजन करण्याच्या व्यर्थपणा लक्षात कसा येणार? म्हणून भक्तीमधील आशय नीट समजून घेतला पाहिजे. श्रीरामाला मानणारे श्रीकृष्णाला मानणार नाहीत मोझेसला मानणारे खिस्तांना मानत नाहीत. अशा एकांगी भक्तीमधून काय साध्य होणार? तसेच नुसती भजने गात राहूनही काही प्राप्त होत नाही. जे मिळवायचे आहे ते आधी समजले पाहिजे व ते प्राप्त होण्यासाठी आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे. मगच चक्रावरील सर्व देव-देवतांचे आशीर्वाद मिळत असतात. हे न झाल्यामुळे दत्तात्रेयांच्या भक्तांना पोटाचे त्रास, श्रीरामांच्या भक्तांना उजव्या बाजूने त्रास, शिवभक्तांना हृदय-विकार असे त्रास बऱ्याच लोकांमध्ये दिसून येतात.

सहजयोग या बाबतीत अगदी वेगळा आहे. **सहजयोगातील भक्ति आपण कुणाची व का करतो हे साधकाला समजलेले असते; मंत्राचा फायदा त्याला समजलेला असतो.** आत्मसाक्षात्कार झाल्यावर तुम्ही सामूहिकतेमध्ये उतरता व भक्तीमध्ये कसले पंथ वा भेद रहात नाही, हिंदु-मुस्लीम-इसाई हे भेदभावही रहात नाही. परमात्मा सगळ्यांसाठी एकच आहे. मोहम्मद सा. अल्ला-हो-अकबर म्हणाले त्यात विराट (श्रीकृष्ण) चाच उल्लेख होता, खिस्त दोन बोटे दाखवून विष्णु व श्रीकृष्णाचेच संदर्भ सांगत होते. मोहम्मदसाहेबही दत्तात्रेयांचे अवतरण होते. त्यांनी व कबीरांनी सारखाच उपदेश केला होता. ज्यूंचा मोझेस हेहि दत्तात्रेयांचा अवतार होता. अर्थात धर्म-धर्म म्हणून झगडा होऊ शकत नाही; या सर्व थोरपुरुषांचे नाते सूर्य आणि त्याचा प्रकाशाइतके एकजीवी होते. त्यांना वेगवेगळे समजून भांडण-लढाई करणारे स्वतःचेच नुकसान करून घेतात. या थोर मंडळींनी केलेले उपदेश व नियम कालानुरूप व्यवस्था होती. मोहम्मद साहेबांच्या काळांत स्त्रियांची संख्या खूप कमी होती म्हणून विवाह-संस्था टिकवण्यासाठी पुरुषांना बहु-पत्नी करण्याची परवानगी होती. मोझेसच्या काळी ज्यू लोक अगदी अधोगतीला गेले होते म्हणून त्यांनी 'शरीयत' सांगितली. पण आता मुसलमान त्याच्यावर अधिकार दाखवतात. हिंदू लोकांतही अनेक गैरसमजूती आल्या आहेत, खरे तर 'हिंदु' हा शब्दच टाकला पाहिजे. तो सिकंदराने सिंधू नदीकाठचे या अर्थाने ठेवला होता, खरे तर सर्वजण 'भारतीय' म्हटले पाहिजेत. ही भारतीय संस्कृति फार पुरातन आहे व फार पूर्वीपासूनच्या ग्रंथ-पुराणामध्ये कुण्डलिनीबद्दल सांगितलेले व लिहिलेले आहे.

म्हणून आत्ताचा समय फार निकडीचा आहे व आत्मसाक्षात्कार मिळवण्याची हीच वेळ आहे. नानकसाहेबही म्हणाले होते की, कहे नानक बिन आपात्ति मे दिसे. भ्रमकी काई. नानक, श्रीराम, श्रीकृष्ण, मोहम्मद, येशू, बुद्ध, महावीर, खिस्त इ. नावे घेतली तर चैतन्य, लहरी जाणवू लागतात. पण 'योग' नसल्यामुळे त्या काळी आत्मसाक्षात्काराचे कार्य होऊ शकले नाही. पण आता ती वेळ आली आहे. जन्मोजन्मी परमात्म्याचा वेगवेगळ्या मार्गांनी चाललेला शोध संपण्याची ही वेळ आहे. परमात्माही तुमच्यावर प्रेमच करतो. म्हणून तुमची ही असहायता त्याला पहावत नाही. प्रकाशात आल्यावरच तुम्हाला समजते की हिंदु, मुसलमान, खिश्चन हे सारे एकाच परमात्म्याचे भक्त आहेत.

भक्तीमध्ये फक्त प्रेमच पसरणारे असते म्हणून भक्ति करणारा कधीही वैर बाळगू शकत नाही; तो प्रेमाच्या धाग्यामधूनच सर्वांना एकत्र बांधून ठेवतो. हा अनुभव फार आल्हाददायक असतो. म्हणून माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की आत्मप्रकाशात या आणि आपल्या मानव जन्माचा गौरव मिळवा. 'सूरदास की सभी अविद्या दूर करो नंदलाल'' असे सूरदासाने म्हटले त्याचा आशय हाच आहे. तुम्हाला फक्त थोडेसेच चालायचे आहे आणि हे मिळवायचे आहे ज्याच्याशिवाय बाकी सर्व व्यर्थ आहे. हे तुम्हालाच समजणार आहे. कर्म आणि भक्ति या दोन्ही मार्गाचे ज्ञान हेच फळ आहे.

परमात्म्याचे सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

**तुम्ही जास्तीत जास्त सामूहिकतेत उतरायला हवे. तुम्ही जास्त लोकांना भेटत रहा, जास्त उत्सुकता दाखवा. हे तुमच्या शरीरासारखे आहे. त्याचा जितका वापर कराल तितकी त्याची क्षमता वाढत राहते.....**

# सहज-समाचार

## महाराष्ट्र सेमिनार २००० - नाशिक

या वर्षीचा महाराष्ट्र-सहजयोग-सेमिनार नाशिक येथे १३ ते १५ ऑगस्ट २००० या तीन दिवसांत उत्साहपूर्ण व चैतन्यमय वातावरणांत पार पडला. सुमारे १५०० सहजयोगी सेमिनारमध्ये उपस्थित होते. सर्व उपस्थितांची राहण्याची व इतर व्यवस्था अगत्यपूर्वक केली असल्यामुळे सर्वांना निवांतपणे सेमिनारचा आनंद लुटता आला; त्यासाठी नाशिकच्या युवाशक्तीने खूप कष्ट घेतल्याचे सर्वांना जाणवले.

सेमिनारचे स्थान नाशिक व आवार सामूहिकतेसाठी प्रसन्न राहील याची विशेष खबरदारी घेऊन स्टेज व सजावट कलात्मक पद्धतीने केली होती. सेमिनारच्या नियोजनातील आणखी एक वैशिष्ट्य असे जाणवले की सेमिनारमधील सर्व कार्यक्रम कसलाही आराखडा वा वेळापत्रक न ठेवता 'सहज'मध्येच व उत्स्फूर्तपणे होत होते. हा बांधिलपणा नसल्यामुळे कार्यक्रमांत एक प्रकारचा ताजेपणा व उत्सुकता दिसून आली. तसेच कार्यकर्त्यांमध्येही व्यवस्था बघताना कसलेही दडपण वा तणाव जाणवत नव्हता.

पूजा व हवन पार पडल्यानंतर सेमिनारच्या कार्यक्रमांस सुरवात झाली. तीन दिवसांच्या सत्रांमधून अनेक ज्येष्ठ सहजयोग्यांकडून वेगवेगळ्या विषयांबद्दल मार्गदर्शन झाले. त्यामध्ये प. पू. श्रीमाताजींच्या अवतरूण-स्वरुपांतील कार्याचा उद्देश व महत्त्व, सहजयोग्यांमधील व माणसा-माणसांमधील प्रेमभावनेची वृद्धि, समर्पण व आत्मपरीक्षण, सहजयोग्यांची जबाबदारी, सहजयोगाचा प्रचार व प्रसार, चित्त व ध्यान, सहजयोग्यांच्या स्थितीमधील प्रगति व गहनता, सहजयोगामधून रोग निवारण, समृद्ध सामूहिकतेची आवश्यकता इ. विविध अंग-उपांगाबद्दल मार्गदर्शन झाले.

सेमिनारमीधल सांस्कृतिक कार्यक्रमांत कवि-संमेलन हा एक आगळा कार्यक्रम रंगतदार झाला. त्याचप्रमाणे संगीत व भजनांमधून चैतन्यवृद्धि व मनोरंजनाचे कार्यक्रम होते. नृत्य, नाटिका, युवाशक्तीने सादर केलेला गोंधळ व तत्सम कार्यक्रम इ. मुळे श्रोते रंगून गेले. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे एक ३-४ वर्षाची मुलगी श्रोत्यांमधेच उभी राहून गाणी-भजनांच्या साथीमध्ये उत्स्फूर्तपणे खूप वेळ नाचण्यांत रंगून गेली होती. तसेच एका ८-१० वर्षाच्या मुलाने वाद्यवृंदामध्ये तबल्यावर उत्कृष्ट साथ केली.

अशा तऱ्हेने हा नाशिकचा महाराष्ट्र-सेमिनार २००० चा कार्यक्रम आनंदात व यशस्वीपणे पार पडला. नाशिक-सेंटरमधील कार्यकर्त्यांचे अभिनंदन!

## श्री आदिशक्ति पूजा

या वर्षी आदिशक्ति पूजा अमेरिकेत कान्हा-जोहारी इथे प. पू. श्रीमाताजींच्या चरणी केली गेली. सर्व वातावरण उत्साहपूर्ण व चैतन्यमय होते. उपस्थित सहजयोग्यांची संख्या १५०० च्या जवळपास होती. या प्रसंगी प्रथमच सहजयोग्यांचा विवाहसमारंभ झाला व पंचवीस विवाह साजरे झाले; त्यामध्ये चार भारतीय सहजयोगी होते.

# नामदेवांचा अभंग

संत नामदवे पंजाबात गेले होते तेव्हा गुरू नानकसाहेबांनी त्यांचा फार आदर व सन्मान केला. नामदेवांनी हिंदी शिकून हिंदीमध्ये बऱ्याच अभंगरचना केल्या; त्यांच्या काही अभंगाचा नानकसाहेबांनी श्री गुरूग्रंथ-साहिबामध्ये समावेश केला. त्यापैकी एक रचना–

'आनीले कागदु काटीले गूडी, आकासामध्ये भरमीअले।
पंचजनासिउ बात बतऊआ, चीतु सुडोरी राखीयले॥
मुन रामुनामा बेधीयले। जैसे कनिक कलाचितु भांडीअले ॥
आनीले कुंभु भराईले उदकु राजकुआरी पुरंदरीए।
हसत विनोद बीचार करती है, चीतसु गागरि राखीअले॥

मुले खेळायला जातात. कागद व कामट्या गोळा करतात. पतंग बनवतात. आभाळात पतंग उडवतात मुले गप्पागोष्टी करत असतात. पण पतंगाने गोते खाऊ नयेत, म्हणून त्यांचे सारे लक्ष मात्र पतंगाच्या गतीकडे असते. गावातल्या पुरंध्री घागरी घेऊन पाणवठ्यावर जमतात. आपापल्या घागरी पाण्याने भरून घेतात. सुखदु:खाच्या गोष्टी एकमेकींना सांगतात. पण ते करताना घागरीतले पाणी सांडू नये, इकडे त्यांचे ध्यान असते.

प्रपंचातले कामधाम करताना आपले शरीर त्यात गुंतलेले असले, तरी चिंतनात मग्न असले पाहिजे, हाच बाबा नामदेवजी यांचा संदेश आहे!

# सरस्वती पूजा

## प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

## धुळे : १३.१.८३

तुम्ही लोकांना आज इथे केलेली सर्व तयारी खूप कलात्मक तऱ्हेने केली असल्याचे पाहून मला फार आनंद होत आहे. देवी सरस्वतीच्या गुणांचे मूलतत्त्व प्रेम हाच आहे; अंतःकरणांत प्रेम असल्याशिवाय कलानिर्मिती होऊ शकत नाही. खोलवर जाऊन विचार केला तर शास्त्रीय संशोधनही सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी असते, त्यामागे शास्त्रज्ञाचा स्वार्थ नसतो. अॅटम बॉम्बच्या शोधामुळे घडून आलेला संहार पाहिल्यावरच लोकांना युद्धामुळे काहीही कल्याण होणार नाही हे समजून चुकले. सरस्वती-शक्तीचे उजव्या बाजूचे कार्य प्रेमापासून सुरू होते व त्याचा शेवटही प्रेमातच होतो. ज्याच्यामागे प्रेमाची प्रेरणा नाही ते कार्य कुचकामी ठरते; त्याचप्रमाणे वस्तूचाही प्रेमासाठी उपयोग झाला नाही तर ती नष्ट होते. प्रसार-माध्यमातीलही सर्व-साधारण जनसमूहाला वेढणाऱ्या सर्व अनिष्ट प्रवृत्ति कालान्तराने पडद्याआड जातात. परमेश्वराच्या या प्रेमशक्तीची जाणीव आपल्याला चैतन्य-लहरींमधून समजते. ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळालेला नाही अशा लोकांना व्हायब्रेशन्स असतात पण त्यांची जाणीव त्यांना होत नाही. ठिकठिकाणची ख्यातनाम पेन्टिंग्ज, शिल्पकला इ.नाही व्हायब्रेशन्स असतात म्हणूनच ती शतकानुशतके पाहणाऱ्याला मुग्ध करतात, ज्या कलाकृतींना व्हायब्रेशन्स नसतात त्या कलाकृती कालाच्या ओघामध्ये टिकून रहात नाहीत. प्रेरणादायी, चिरंतन कलाकृतींच्या मागे अंतरंगातील प्रेमाचीच शक्ति असते. शेवटी साऱ्या जगाला परमेश्वरी प्रेमशक्तीबरोबरच रहावे लागणार आहे. म्हणूनच निकृष्ट आणि उत्तानकारक जाहिरातबाजीचा प्रभाव फार काळ टिकून राहणार नाही. पाश्चिमात्य लोकांना हे जास्त लागू पडण्यासारखे असले तरी कालान्तराने तेहि सुधारतील. परमेश्वरी शक्तीच सर्व काही चालवणारी सत्ता असल्यामुळे त्यांच्यासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतीय जीवनपद्धत विकासाच्या व आधुनिकतेच्या मार्गावर येत असल्यामुळे त्यांनीही या गोष्टी गांभीर्याने लक्षात घेतल्या पाहिजेत.

बहुतेक पाश्चात्य लोकांना सूर्याची आवड असते. त्यांच्या देशांत सूर्य कमी दिसत असल्यामुळे हे असेल. पण त्या बाबतीतही ते अगदी टोकाला जातात आणि त्यांतून त्यांच्या अडचणी निर्माण होतात. सूर्याच्या बाबतीत मुख्य गोष्ट म्हणजे तो 'प्रकाश' (LIGHT) देतो; हा प्रकाशच आपल्याला आतमध्ये घ्यायचा आहे. सूर्य चक्रावर ख्रिस्त आहेत आणि ते मूर्तिमंत पावित्र्य आहेत. पाश्चात्य देशांमध्ये नीतिमत्तेला महत्त्व दिले जात नाही. आणि नीतिमत्तेचा अभाव असेल तिथे सूर्याचे आशीर्वाद मिळत नाहीत. सूर्यप्रकाशामुळे अज्ञानाचा अंधःकार आणि अधार्मिकतेचा अंधःकार, प्रेम व सुंदरतेच्या अभावाचा अंधःकार दूर होतो. प्रकाश म्हणजे डोळ्यांनी दिसणे नव्हे तर आपल्या 'आंत'मध्ये प्रकाश पडणे; आणि हा प्रकाश शुद्ध प्रेमाचा, शुद्ध अबोधितेचा, शुद्ध जाणीवेचा, शुद्ध ज्ञानाचा असला पाहिजे. हा प्रकाश जर तुम्ही आंतमध्ये मिळवला तर सर्वकाही बदलून सुंदर होणार आहे. गहनतेमध्ये पूर्णतया प्रगल्भ झाल्यावरच हा प्रकाश तुम्हाला मिळतो. हा प्रकाश बिघडवल्यामुळे आपण सरस्वतीच्या विरोधात जाऊन स्वतःचेच नुकसान करून घेत असतो. आपली चक्रेही शुद्ध तत्त्वांमधून निर्माण केलेली असली तरी आपण मन आणि बुद्धीच्या आहारी जाऊन त्यांच्या कार्यात बिघाड आणतो; बुद्धीच्या अति वापरामुळे आपण स्वतःला फार मोठे समजू लागतो व अहंकारी बनतो. सरस्वती-पूजेचे आशीर्वाद मिळण्यासाठी आपण कुठे चुकतो हे आत्मपरीक्षण करून समजून घेतले पाहिजे.

याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट अहंकाराबाबत. प्रथम हे समजून घेतले पाहिजे की **अहंकार ही मिथ्या भावना आहे.** तुमचे चित्त इकडे-तिकडे भरकटण्याच्या मागे आपला अहंकारच असतो हे पक्के लक्षात ठेवा; **फक्त परमेश्वराजवळच महत्-अहंकार आहे आणि माणसाचा अहंकार ही माया आहे.** अहंकार जेव्हा बाहेर पडू लागतो तेव्हा माणूस दुसऱ्यावर हुकूमत किंवा अधिकार गाजवू पाहतो; अहंकार जेव्हा उजवीकडे येतो.

(Super-conscious) तेव्हा तुमच्या मनांत अनाठायी भ्रामक कल्पना येऊ लागता; अहंकार जेव्हा डावीकडून फुगू लागतो तेव्हा तुम्ही स्वतःला फार मोठी व्यक्ति समजू लागता; अहंकार जेव्हा डोक्याच्या मागील बाजूस येतो तेव्हा तुम्ही स्वतःला गुरू समजू लागता व लोकांना चुकीचे मार्गदर्शन करू लागता. डोक्याच्या मागील बाजूकडचा अहंकार फार वाईट. याशिवाय उजव्या विशुद्धीला त्रास होईल असे बोलू लागता तेव्हा हा अहंकार जास्त बळकट (कठीण) बनतो व तो सुधारणे त्रासदायक होते. असा माणूस फक्त स्वतःचाच विचार करतो आणि स्वतःलाच सर्व समजले असे वागतो. म्हणून गर्विष्ठासारखी भाषा वापरतांना फार संभाळून रहा. उजव्या विशुष्टीचा नीट वापर करा. **स्वतःचा मोठेपणा दाखवण्याच्या फंदांत पडू नका; नाहीतर स्वतःचेच नुकसान करून घ्याल.** यासाठी स्वतःकडेच लक्ष ठेऊन काळजी घेणे जरूरीचे आहे. स्वतःजवळ खूप शक्ति आहे अशी भाषा वापरू नका. आणखी एक म्हणजे सहजयोगाविषयी वा कुण्डलिनी-शक्तिविषयी बोलताना 'मी' हा शब्द न वापरता 'आम्ही' असे शब्दप्रयोग करत चला. **सहजयोग ही सामूहिक प्रक्रिया आहे आणि तो सामूहिकलेमधूनच कार्यान्वित होतो;** तो सर्वांसाठी आहे. सर्वांच्या कल्याणासाठी व उद्धारासाठी आहे. म्हणून **दुसऱ्या सहजयोग्याला खाली खेचण्याच्या भानगडीत पडू नका. ज्याला सर्वांना सामावून घेण्याची क्षमता असते तोच खरा सहजयोगी हे लक्षात ठेवा.**

तुमच्या आईकडेच पहा, तुम्ही माझ्यासमोर असा किंवा दूर असा, मी तुम्हा सर्वांची काळजी घेत असते. ह्या स्थितीमध्ये येणे हे फार सुखकारक आहे. तो एक सुंदर अनुभव आहे, ती सर्वोच्च स्थिती आहे. म्हणून एखाद्या डबक्यात राहणारे न बनता विशाल बनले पाहिजे. मला फार लहानपणी धुळीच्या कणासारखे व्हावे ही इच्छा होत असे, तशी एक कविताही मला सुचली होती; वाऱ्याबरोबर विहार करताना तो धूल-कण कुठे फुलावर बसेल, झाडाच्या शेंड्यावर येऊन थांबेल किंवा कुणा सत्पुरुषाच्या पायावर येईल. ही स्थिति आल्हादकारक, सुगंधी आणि प्रेरणादायी असते. सहजयोगी एक दिवस या स्थितीला येतील अशी मला आशा आहे.

इथे जमलेल्या पाश्चात्य मंडळींनाही मला सांगावेसे वाटते की तुम्ही भारतीय बांधवांबरोबर मिसळा, त्यांच्याशी संवाद करा. भाषेची अडचण वाटून घेऊ नका. हे पसरणे (Premeation) होण्यासाठीही अहंकाराच्या पलीकडे जावे लागते. त्यातून तुमचे उजव्या बाजूचे प्रश्न सुटतील आणि सरस्वतीचे आशीर्वाद मिळतील. **सरस्वतीच्या हातांतील वीणा याचेच द्योतक आहे; त्याचे कर्णमधूर स्वर हळुवारपणे सगळीकडे पसरतात. सरस्वती शक्ति सगळीकडे पसरणारी, सूक्ष्मांतून कार्य करणारी असते.** पंचमहाभूते ही सुक्ष्मात शिरल्यावर अभिव्यक्त होऊ लागतात. धरतीमातेचा गुण गंधामध्ये उतरतो, नादांमधून आल्हादकारक संगीत प्रगटते, वस्तुमात्रा विद्युत होतात, पाण्यापासून वाफ होते आणि वायू चैतन्यलहरींमधून जाणीवेत येतो आणि या सर्वांच्या पाठीशी प्रेम-शक्ति असते. तुम्ही सर्वांशी आपले जीवन असेच प्रेममय व सुगंधमय बनवा.

सर्वांना अनंत आशीर्वाद

●●●

**..... नुसते स्वतःपुरतेच करत रहाल ते (चैतन्य) सामुदायिकरीत्या कार्यान्वित होणार नाही. कारण त्याचा उपयोग तुम्ही कोठे करता? तुम्ही स्वतः स्वच्छ होऊन ते दुसऱ्यांना द्यायला हवे, तसे दिले नाही तर ते सामुदायिकतेने कार्यान्वित होणार नाही, सगळीकडे पसरणार नाही.....**

# सहजयोग सेमीनार, २००० पुणे काही क्षणचित्रे



'चैतन्यदीप २०००' पुस्तकाचे श्री. योगी महाजन यांचे हस्ते उद्घाटन करताना सोबत चैन्नईचे लीडर श्री. रेड्डी व हैद्राबादचे लीडर श्री. मोहनराव




नॅशनल युवा शक्ती न्यूज लेटर या मासिकाचे श्री. विजयकुमार गौतम यांच्या हस्ते उद्घाटन करताना



इंडियाचे लीडर श्री. अरुण गोयल यांचे स्वागत पुण्याचे लीडर श्री. पुगालीया करताना



सेमीनारमधील मनोरंजनात्मक कार्यक्रम 'कौन बनेगा ग्यानपती' सादर करताना श्री. पुगालीया, सोबत श्री. अरुण गोयल



श्री. सिंपल यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी संपूर्ण हॉल नाचताना